रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ३४९ | पृष्ठे ८ | RGD/016/2026-28

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २७ मे २०२६

किंमत ४ ₹

## कोकणवासियांचे स्वप्न पूर्ण

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२६) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारदेखील उपस्थित होत्या. या बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये सावंतवाडी रेल्वे स्थानकाला लोकनेते मधू दंडवते यांचे नाव देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. याबाबत आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात आला. मधू दंडवते यांचं कोकण रेल्वेसाठी योगदान पाहता त्यांच नाव देण्याची अनेक वर्षांची मागणी होती. परिवहन विभागाकडून याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

## मान्सूनचे आगमन लांबणीवर

**मुंबई :** केरळमध्ये मान्सून दाखल होण्यासाठी अजून काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार असून, राज्यात मान्सूनचे आगमन ८ ते १० जूनदरम्यान होण्याची शक्यता असल्याची माहिती हवामान विभागप्रमुख एस.डी. सानप यांनी दिली. सानप म्हणाले, मान्सून सध्या अरबी समुद्रातून श्रीलंका मार्गे अंदमान-निकोबारपर्यंत पोहोचला आहे. मात्र, केरळमध्ये दाखल होण्यासाठी आवश्यक वातावरणीय परिस्थिती अद्याप पूर्णपणे अनुकूल झालेली नाही. पुढील चार दिवसांत परिस्थिती पोषक झाल्यास मान्सून केरळमध्ये दाखल होऊ शकतो. दरम्यान, विदर्भात पुढील दोन दिवसांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### वे|ध|क

## मंत्रालयात चोरी

**मुंबई :** शिवसेना नेते आणि राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या मंत्रालयातील कार्यालयातून तब्बल ८० हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याची चर्चा आहे. थेट मंत्र्यांच्याच दालनात चोरी झाल्याने खळबळ उडाली आहे. या चोरीच्या घटनेनंतर आता मंत्रालयातील नियमांवरून एक नवीनच राजकीय आणि प्रशासकीय चर्चा रंगू लागली आहे. नियमांनुसार, मंत्रालयात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा कर्मचाऱ्याला आपल्यासोबत दहा हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम आत घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे. मुख्य प्रवेशद्वारावरच तपासणीदरम्यान तशा सूचना दिल्या जातात. असे असताना मंत्री संजय राठोड यांच्या शासकीय कार्यालयात तब्बल ८० हजार रुपयांची एवढी मोठी रोकड आली कुठून? याबाबत आता उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

## कांद्याला योग्य हमीभाव द्या!

**नाशिक :** कांद्याला सध्या प्रति क्विंटल २००-३०० रुपये एवढा कमी भाव मिळत असून, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आजच्या विदारक परिस्थितीस भाजपाचे केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारच जबाबदार आहे, असा हल्लाबोल करत शेतकऱ्यांच्या कांद्याला भरीव हमीभाव मिळाल्याशिवाय काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी स्वस्थ बसणार नाही, सरकारला सळो की पळो करून सोडू, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव मिळावा या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली येथे महाविकास आघाडीच्या वतीने शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आला.

# राज्य शासनाकडून विद्यार्थ्यांची थट्टा




**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

शाळा सुरू होण्यासाठी अवघे वीसहून अधिक दिवस शिल्लक असताना विद्यार्थ्यांच्या गणवेशासह वह्या-पुस्तकांच्या खरेदीची लगबग सुरू झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिक्षण विभागाकडून पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेशासाठी अनुदान दिले जाणार आहे. मात्र, यावर्षी शासनाकडून पूर्ण निधी न मिळाल्याने विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गणवेशाच्या रकमेवर कात्री लागली आहे. तीनशे रुपयांऐवजी केवळ २४० रुपयेच एका गणवेशामागे दिले जाणार असल्याने वाढत्या महागाईच्या काळातशासनविद्यार्थ्यांची थट्टा करत असल्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

पान २ वर

> विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच गणवेश मिळावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शाळा व्यवस्थापन समित्यांकडे गणवेशाची रक्कम वितरित केली जाणार आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व मुली, अनुसूचित जाती-जमाती, सर्वसाधारण इतर मागासवर्गीय तसेच दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. यावर्षी शासनाकडून ८० टक्के निधी प्राप्त झाल्याने २४० रुपयांप्रमाणे अनुदान वितरित केले जाणार आहे.
>
> – मनिषा दहितुले, शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग

### पालकांमध्ये नाराजी

जिल्ह्यातील एकूण ८९ हजार ७२८ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ दिला जाणार आहे. यासाठी शासनाकडून दोन कोटी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र, यावर्षी शासनाकडून केवळ ८० टक्के निधी प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाच्या अनुदानात कपात करण्यात आली आहे. परिणामी, तीनशे रुपयांच्या अपेक्षित रकमेऐवजी फक्त २४० रुपये विद्यार्थ्यांना दिले जाणार आहेत.

# महिला पोलीसचे निलंबन

### पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचा दणका

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्यावर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी निलंबनाची कारवाई केल्याने रायगड पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीचा पाठलाग करून तिला त्रास देणाऱ्या आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप संबंधित महिला कर्मचाऱ्यावर करण्यात आला आहे. कर्तव्यात गंभीर कसूर केल्याचा ठपका ठेवत ही कठोर कारवाई करण्यात आल्याची चर्चा पोलीस दलात सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागपरिसरातएकाव्यक्तीकडून एका तरुणीचा दुचाकीवरून वारंवार पाठलाग केला जात होता. आरोपी सतत हॉर्न वाजवत तिचा मानसिक छळ करीत होता. तसेच तिच्याशी जबरदस्तीने जवळीक साधण्याचाही प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकाराला कंटाळून संबंधित पीडित महिलेने अलिबाग पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपीविरोधात तक्रार दाखल केली.

> संबंधित पीडित महिलेच्या प्रकरणात चार तासांच्या आत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदारांनी केलेले आरोप पूर्णपणे खोटे आहेत.
>
> – ज्योत्स्ना मासे, पोलीस कर्मचारी

या प्रकरणाचा तपास महिला पोलीस कर्मचारी ज्योत्स्ना मासे यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. मात्र, फिर्यादी महिलेला न्याय आणि मदत करण्याऐवजी आरोपीलाच वाचविण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला. याप्रकरणी थेट पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडे तक्रार पोहोचली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत एसपी दलाल यांनी तात्काळ चौकशी करून मासे यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई केली.

या कारवाईमुळे संपूर्ण पोलीस दलात खळबळ उडाली असून, महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर आता अधिक गंभीर चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, ज्योत्स्ना मासे या सध्या अलिबाग पोलीस ठाण्यात प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. यापूर्वी त्या अलिबाग पोलीस ठाण्यातच कार्यरत होत्या. त्यानंतर त्यांची बदली पोलीस मुख्यालयात करण्यात आली होती. मात्र, प्रतिनियुक्तीवर त्या पुन्हा गेल्या अनेक महिन्यांपासून अलिबाग पोलीस ठाण्यात कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असताना, त्याच विभागातील महिला पोलीस कर्मचाऱ्यांकडूनच दुर्लक्ष होत असेल, तर सामान्य महिलांनी न्यायासाठी नेमके कोणाकडे धाव घ्यायची? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

पान २ वर

# पूर्ववैमनस्यातून हत्या; दोन मारेकरी जेरबंद

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलमधील पटेल मोहल्ला परिसरात ४४ वर्षीय व्यक्तीवर तिघांनी धारदार शस्त्राने आणि लाथाबुक्क्यांनी हल्ला करुन त्याची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी दोघा मारेकऱ्यांना अटक केली आहे.

या हत्या प्रकरणातील मृत व्यक्तीचे नाव सलीम अनवर शेख (४४) असे असून, तो पनवेलमधील पटेल मोहल्ला परिसरात राहण्यास होता. मृत सलीम शेख याचे त्याच परिसरात राहणाऱ्या महिलेसोबत अनैतिक संबंध होते. सलीम शेख गेल्या आठ दिवसांपासून त्याच्या प्रेयसीला सोडून स्वतःच्या पत्नीसोबत राहू लागला होता. याच कारणाचा राग मनात धरून आरोपींनी सदरचा हल्ला केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पनवेल येथील पटेल मोहल्ल्यातील मशिदीजवळ आरोपींनी सलीम शेख याला गाठले. त्यानंतर मुख्य आरोपी शाहनवाज अलताफ शेख याने सलीमच्या पाठीवर धारदार शस्त्राने एकापाठोपाठ एक असे चार ते पाच वार केले. तसेच त्याच्या डोक्यात गंभीर दुखापत केली. तर आरोपी सलीम खमु शेख आणि अलताफ शेख यांनी सलीमला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करुन तिथून

पान २ वर

# मंत्र्यांच्या मतदारसंघात पाण्याची बोंब!

- ओंजळीभर पाण्यासाठी महिलांची जीवघेणी पायपीट
- झोरेवाडीवर पाण्याचे संकट; मंत्री गोगावले लक्ष देणार का?

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील झोरेवाडीमध्ये भीषण पाणीटंचाईने नागरिकांचे जगणे असह्य केले आहे. रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांच्या मतदारसंघातील महिलांवर आज ओंजळीभर पाण्यासाठी डोंगर-दऱ्यांतून जीवघेणी पायपीट करण्याची वेळ आली आहे. घोटभर पाण्यासाठी सुरू असलेली ही वणवण आता केवळ टंचाईपुरती मर्यादित राहिलेली नसून,

पान २ वर



### गावकऱ्यांच्या नशिबी कोरडे घडे!

विशेष म्हणजे, झोरेवाडीपासून हाकेच्या अंतरावर धरण आणि नदी असूनही गावकऱ्यांच्या नशिबी कोरडे घडेच आले आहेत. प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे उपलब्ध जलस्रोतांचा लाभ गावापर्यंत पोहोचत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पाणीटंचाईमुळे गावातील अनेक तरुण रोजगारासाठी मुंबईसह इतर जिल्हे आणि राज्यांत स्थलांतरित झाले आहेत. गावात सध्या प्रामुख्याने वृद्ध महिला आणि काही मोजकी मंडळीच राहात असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पाण्यासाठीची झुंज अधिकच वेदनादायी बनली आहे.




# २९ लाखांचा बूस्टर पंप ठरला फुसका?

- खारेपाटकरांची अजूनही पाण्यासाठी वणवण सुरूच
- खर्च झाला, पण टंचाई कायम

**| पेण | प्रतिनिधी |**

खारेपाट परिसरातील तीव्र पाणीटंचाई दूर करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने मोठ्या गाजावाजात मुख्य जलवाहिनीवर बसवलेला बूस्टर पंप अद्याप निष्प्रभ ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. तब्बल २९ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या यंत्रणेचा पंधरा दिवस उलटूनही नागरिकांना कोणताही ठोस फायदा झालेला नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोट्यवधींच्या योजना कागदावरच, पण नळ मात्र कोरडेच, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

खारेपाट भागात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा दाब वाढवून अधिक प्रमाणात पाणी नागरिकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने मुख्य जलवाहिनीवर बूस्टर पंप बसविण्यात आला होता. जिल्हाधिकारी आपत्कालीन टंचाई निधीतून यासाठी सुमारे २९ लाख

पान २ वर

# द्रोणागिरी पर्वतावर मातीमाफियांचा हैदोस!

### मातीचोर देवेंद्र कोणाच्या आशीर्वादाने मोकाट?

**| उरण | प्रतिनिधी |**

ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व असलेल्या द्रोणागिरी पर्वतावर अवैध माती उत्खनन सुरू असल्याचा गंभीर प्रकार करंजा परिसरात उघडकीस आला आहे. करंजा येथील द्रोणागिरी हायस्कूलच्या मागील बाजूस गेल्या आठ दिवसांपासून देवेंद्र नावाचा कथित मातीचोर शासकीय परवानगीशिवाय माती उत्खनन करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.



विशेष म्हणजे, सदर जागा शासकीय तसेच वन विभागाच्या अखत्यारित येत असून, द्रोणागिरी पर्वत परिसरात उत्खननास बंदी असतानाही जेसीबीच्या सहाय्याने सर्रासपणे पर्वताचे लचके तोडले जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या परिसरात सुरू असलेल्या अवैध उत्खननाकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. हा मातीचोर नेमका कोणाच्या कृपाशीर्वादाने एवढा बिनधास्तपणे माती चोरी करत आहे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

महसूल विभाग, वन विभाग आणि स्थानिक प्रशासन यांची भूमिका संशयास्पद असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणात संबंधितांवर गुन्हे दाखल होणार का? की शासकीय अधिकारी चिरीमिरी घेऊन गप्प बसणार? याकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे.





### मांडवा-गेटवे जलवाहतूक बंद | अलिबाग आगार सज्ज


# बोटी थांबल्या, आता एसटीचाच आधार!

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव मंगळवार (दि. २६) पासून मांडवा ते गेटवे ही प्रवासी जलवाहतूक सेवा बंद करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे मुंबई-रायगडदरम्यान जलमार्गाने प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांसह पर्यटकांचा भार आता राज्य परिवहन महामंडळावर पडणार आहे. वाढती गर्दी लक्षात घेता प्रवाशांना वेळेवर आणि सुरळीत सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अलिबाग आगाराकडून विशेष नियोजन करण्यात आले असून, कर्जत आणि पेण आगारातूनही अतिरिक्त बसेस मागविण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.



● (छायाचित्र : समीर मालोदे)




दरम्यान, शाळा आणि महाविद्यालयांना सुट्ट्या लागल्याने सध्या रायगड जिल्ह्यात पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात, म्हणजेच १५ जूनपासून शाळा सुरू होणार असल्याने अनेकांनी सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी रायगडकडे मोर्चा वळवला आहे. काही जण आपल्या मूळ गावी दाखल झाले आहेत, तर अनेक पर्यटक समुद्रकिनारे, किल्ले आणि विविध पर्यटनस्थळांचा आनंद घेण्यासाठी रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत.

शनिवार आणि रविवारी हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि कॉटेजेस हाऊसफुल्ल होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः मुंबईहून कमी वेळात रायगडमध्ये पोहोचण्यासाठी पर्यटक जलवाहतुकीला अधिक पसंती देत होते.

पान २ वर

> जलवाहतूक सेवा बंद झाल्यानंतर प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी अलिबाग आगाराकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. विना थांबा फेऱ्या वाढविण्यात येणार असून, कर्जत आणि पेण आगारातून अतिरिक्त बसेस मागविल्या आहेत. वाढती गर्दी लक्षात घेऊन गरजेनुसार आणखी बससेवाही वाढविण्यात येईल. प्रवासी आणि पर्यटकांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेत पोहोचता यावे, यासाठी आम्ही पूर्ण तयारीत आहोत.
>
> – राकेश देवरे, आगार व्यवस्थापक, अलिबाग एसटी आगार

# पान १ वरून

## शासनाकडून विद्यार्थ्यांची थट्टा

रायगड जिल्हा परिषद अंतर्गत पहिली ते आठवीपर्यंतच्या तब्बल दोन हजार ४७३ शाळा असून, या शाळांमध्ये सुमारे ९८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांनी शाळेकडे आकर्षित व्हावे, शाळेत रमावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शिक्षण विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. दप्तराविना शाळा यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक तसेच शारीरिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सध्या जिल्हा परिषद शाळांना उन्हाळी सुट्टी असून, १५ जूननंतर शाळा सुरू होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवसापासून गणवेश उपलब्ध व्हावा यासाठी शिक्षण विभागाने तयारी सुरू केली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून शाळा व्यवस्थापन समित्यांमार्फत गणवेशासाठी निधी वितरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत, तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील मुले आणि इतर मागासवर्गीय घटकांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडचणीमुळे खंड पडू नये, यासाठी शासनाने मोफत गणवेश योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील एकूण ८९ हजार ७२८ विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ दिला जाणार आहे. यासाठी शासनाकडून दोन कोटी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.मात्र, यावर्षी शासनाकडून केवळ ८० टक्के निधी प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाच्या अनुदानात कपात करण्यात आली आहे. परिणामी, तीनशे रुपयांच्या अपेक्षित रकमेऐवजी फक्त २४० रुपये विद्यार्थ्यांना दिले जाणार आहेत. सध्याच्या वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर एवढ्या कमी रकमेत विद्यार्थ्यांचा गणवेश कसा तयार होणार, असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले आहे.

## महिला पोलीसचे निलंबन

दरम्यान, कर्तव्यात हलगर्जीपणा आणि कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर भूमिका घेत पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी आतापर्यंत सातहून अधिक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे रायगड पोलीस दलात शिस्तीचा बडगा अधिक कडक झाल्याचे चित्र आहे.

## मंत्र्यांच्या मतदारसंघात पाण्याची बोंब!

ती गावकऱ्यांच्या जगण्याशी, आरोग्याशी आणि भवितव्याशी थेट जोडली गेली आहे. मंत्र्यांच्या गावातच पाण्याची अशी दुरवस्था असेल, तर अन्य ठिकाणच्या सामान्य जनतेचे काय? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.रायगड जिल्ह्यात सध्या ६४ गावे आणि २३० वाड्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, तब्बल एक लाख १३ हजार ७०१ नागरिक पाण्याच्या संकटात सापडले आहेत. माणगाव तालुक्यातील चार गावे आणि १५ वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असला, तरी पन्हळघर खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील झोरेवाडीची अवस्था मात्र अत्यंत बिकट झाली आहे. सुमारे ३० घरांची आणि २०० हून अधिक लोकवस्ती असलेल्या या वाडीमध्ये आजही पाणी पोहोचलेले नाही. झोरेवाडीमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत ४० हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. मात्र, योजनेचे काम अद्याप अपूर्ण असल्याने गावकऱ्यांना त्याचा कोणताही लाभ मिळालेला नाही. दुसरीकडे स्वदेश फाऊंडेशनमार्फत राबविण्यात आलेली पाणी योजनादेखील व्होल्टेज समस्येमुळे ठप्प पडली आहे. विजेच्या कमी दाबामुळे पाण्याचा पंप बंद पडत असून, गावात पाणीच पोहोचत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.उन्हाळा सुरू झाला की पाणीटंचाईवर बैठका, घोषणा आणि आश्वासनांचा पाऊस पडतो; मात्र झोरेवाडीतील वास्तव आजही अंगावर काटा आणणारे आहे. डोंगर माथ्यावर वसलेल्या या वाडीतील वृद्ध महिलांना हंडाभर पाण्यासाठी कित्येक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. उन्हाच्या तडाख्यात डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणताना महिलांची अक्षरशः दमछाक होत आहे. अनेकदा जीव धोक्यात घालून त्यांना डोंगर उतरत पाणी आणावे लागत आहे.

## पूर्ववैमनस्यातून हत्या

पळ काढला होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत सलीमने त्याच्या प्रेयसीच्या नातेवाईकांसोबत केलेल्या असभ्य वर्तनाचा आणि पूर्ववैमनस्याचा राग मनात धरुन प्रेयसीचा पती, मुलगा आणि त्यांच्या साथीदाराने मिळून सलीमची हत्या केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. त्यानुसार पोलिसांनी तीन आरोपींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन त्यापैकी दोघांना अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पदवार करीत आहेत.

## २९ लाखांचा बूस्टर पंप ठरला फुसका?

रुपयांचा खर्च करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, एवढा निधी खर्चूनही नागरिकांच्या नशिबी अजूनही अपुरा पाणीपुरवठाच येत असल्याने नाराजी वाढू लागली आहे.प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये नळांना अत्यल्प दाबाने पाणी येत असल्याची तक्रार कायम आहे. काही ठिकाणी नागरिकांना अजूनही टँकर किंवा पर्यायी स्रोतांवर अवलंबून राहावे लागत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बूस्टर पंपाच्या कार्यक्षमतेबाबत नागरिकांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामीण पाणीपुरवठा शाखेच्या उपअभियंता एस.एस. देशमुख यांनी घटनास्थळी भेटीदरम्यान सांगितले की, बूस्टर पंप सुरू करण्यात आला असून, पाण्याचा दाब वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, जलवाहिनीतील दाब संतुलन आणि काही तांत्रिक अडचणींमुळे पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा होण्यासाठी काही कालावधी लागत आहे. विभागाकडून सातत्याने पाहणी आणि तांत्रिक सुधारणा सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## बोटी थांबल्या, आता एसटीचाच आधार!

रो-रो सेवेसह पीएनपी, मालदार आणि अजंठा या प्रवासी बोटींच्या सेवेला मोठी मागणी होती. अवघ्या पाऊण तासात अलिबागमध्ये पोहोचता येत असल्याने जलवाहतूक ही पर्यटकांची पहिली पसंती ठरत होती.

मात्र, पावसाळा तोंडावर आल्याने वातावरणात बदल होऊ लागला असून सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने २६ मेपासून जलवाहतूक सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मंगळवारपासून मांडवा-गेटवे मार्गावरील प्रवासी सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. जलवाहतुकीचा पर्याय बंद झाल्याने आता पर्यटक आणि प्रवाशांचा मोठा भार एसटी महामंडळावर येणार आहे. ही वाढती गर्दी लक्षात घेता अलिबाग आगारातून विनाथांबा फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात येणार आहे. तसेच कर्जत आणि पेण आगारातून अतिरिक्त बसेस मागविण्यात आल्या आहेत. प्रवाशांची संख्या वाढल्यास आणखी फेऱ्या वाढविण्याचे नियोजन असल्याची माहिती अलिबाग आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेल्या खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेल्या जमीन मिळकत आमचे अशील यांनी या जमीन मिळकतीचे सध्याचे ब विद्यमान मालक १. गोपीनाथ शंकर मराडे, २. चंद्रकांत शंकर मराडे, ३. पंडित शंकर मराडे, ४. वसंत शंकर मराडे, ५. दीपा राजेश उर्फ राजू मराडे, ६. वेदिका राजेश उर्फ राजू मराडे, ७. वैभव राजेश उर्फ राजू मराडे, यांचेवतीने सुनीला प्यारेलाल शर्मा, यांचेकडून कायम खरेदी करणेचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ४३/५ | ०.०४.०० | ०.०५ |

सदरहू जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीच्या व कब्जा वहिवाटीची आहे. असे ते सांगतात आणि सदरील ७/१२ मध्ये तसे दिसून सुद्धा येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीमध्ये कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक : २६/०५/२०२६ हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८०८७८१४००३

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेल्या खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेल्या जमीन मिळकती आमचे अशील यांनी या जमीन मिळकतींचे खाली नमूद केलेले विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकती**

**१. सुनीला प्यारेलाल शर्मा, यांचे नावे असलल्या मिळकती**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. | ४४/३/अ | ०.७४.०० या एकूण क्षेत्रापैकी ०.२२.०० इतके क्षेत्र विकत देणेचे ठरले आहे | ०.८४ |
| २. | ४४/६ | ०.१८.०० | ०.१७ |
| ३. | ४६/६ | ०.०८.८० | ०.०६ |

**१. सुनीला प्यारेलाल शर्मा, आणि २. कानल प्यारेलाल शर्मा यांचे नावे असलेली मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ४४/३/ब | ०.६६.०० | ०.६६ |

सदरहू जमीन मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक यांच्या मालकीच्या व कब्जा वहिवाटीच्या आहेत असे ते सांगतात आणि सदरील ७/१२ मध्ये तसे दिसून सुद्धा येत आहे. सदर जमीन मिळकती त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतींमध्ये कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनींच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक २६/०५/२०२६ हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८०८७८१४००३

### जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, आमच्या ग्राहकांच्या वतीने आम्ही **प्रफुल्ल मधुसूदन घोलकर** यांच्या हक्क, मालकी व स्वारस्याची चौकशी / पडताळणी करीत आहोत. सदर मालमत्ता ही कृषी जमीन, वारसाहक्कासह असलेली जमीन व जागा असून ती गट क्र. ३९८ (भाग), क्षेत्रफळ ००-५१-०० (एच-आर-पी) इतकी, एकूण ००-७७-५० (एच-आर-पी) मधून, खाते क्र. १००८५ असलेली, मौजे टेकळी, ता. अलीबाग, जि. रायगड येथे स्थित आहे. सदर मालमत्तेचे अधिक तपशील खालील अनुसूचीमध्ये नमूद केले आहे. (यापुढे तिला **'सदर जमीन'** असे संबोधण्यात येईल.)

सदर जमिनीबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणत्याही व्यक्तीस विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, हक्क हस्तांतरण, गहाण, भार, भेट, ट्रस्ट, मालकी कागदपत्र, वारसा, वहिवाट, ताबा, भाडेकरार, पोटभाडेकरार, लीव्ह अँड लायसन्स, लायसन्स, केअरटेकर तत्त्व, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, लियन, देखभाल हक्क, उपभोग हक्क, करारनामा, मुक्तता, हक्क त्याग, अनुदान किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, मालकी, स्वारस्य, दावा, हरकत किंवा मागणी असल्यास, त्यांनी त्यासंबंधीचे सर्व नोटराईज्ड पुराव्याचे कागदपत्रांसह त्यांचा दावा/हरकत या नोटिशीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत खाली सही करणाऱ्यांकडे लेखी स्वरूपात कळवावा. निर्धारित मुदतीत कोणताही दावा/हरकत प्राप्त न झाल्यास, संबंधित व्यक्तीचा दावा, मागणी, हक्क, मालकी, स्वारस्य, वाद किंवा हरकत असल्यास ती कायमची माफ/सोडून दिलेली समजली जाईल व ती आमच्या ग्राहकांवर बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

गाव - टेकळी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित असलेली, गट क्र. ३९८ असलेली, एकूण ००एच-७२ आर-२० पी आणि एफ.एल. ००एच-०८ आर-८० पी (एकूण ००एच-८१आर-०० पी) जमिनीपैकी; प्रफुल्ल मधुसूदन घोलकर यांच्या नावे असलेला खाता क्र. १००८५ आणि १.०९ रुपये इतकी आकारणी (जमाबंदी) असलेली, ००एच-६८ आर-७० पी आणि एफ.एल. ००एच-०८आर-८०पी (एकूण ००एच-७७आर-५०पी) जमिनीपैकी ००एच-५१आर-००पी इतक्या क्षेत्रफळाचा, शेतजमिनीचा, वारसाहक्काने प्राप्त मालमत्तेचा किंवा भूखंडाचा संपूर्ण भाग, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत:

उत्तरेस : गट क्र. ३९९ व मौजे टेकळी येथील गट क्र. ३९८ चा उर्वरित भाग
दक्षिणेस : मौजे झिराड येथील गट क्र. ३६
पूर्वेस : मौजे टेकळी येथील गट क्र. ३९७
पश्चिमेस : मौजे टेकळी येथील गट क्र. ४२३

**दिनांक : २७ मे २०२६**

**नेहा सेहगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट, जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल स्वाती सरुपिया रा. १५, बाजूला हॉस्पिटल रोड, चेतना मेडीकल जवळ, गिर्वा, दयपुर शास्त्री सिर्क्ले, उदयपुर, राजस्थान ३१३००१. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र | | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हे. | आर. | पॉ | रुपये | पैसे |
| ४२ | १/ब | १ | ५६ | ८० | ८ | १९ |

या जमिन मिळकतीपैकी लिहून देणार यांचे मालकीचे हे. आर. पॉ. ०.७१.८० इतके क्षेत्रापैकी हे. आर. पॉ ०.२१.५० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही /-
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक : २७/०५/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल श्रीपाद आगाशे रा.१०६ म्हाडा कॉलनी श्रीबाग, अलिबाग ता.अलिबाग हे असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| सहाण ता.अलिबाग | २९९/४० | २.२६.०० | २२.६० |

सदर वर नमूद केलेली बिनशेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदरच्या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत आणून द्यावे याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास करावे.

अलिबाग सही /-
तारीख २७/०५/२०२६ **ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता- दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that I am investigating the title of Vinod Kishan Nenwani (hereinafter referred to as the said "Owner") with respect to all that piece and parcel of agricultural land bearing Survey Nos. 69/16, 72/1B, 72/3A, 72/6A, 72/6B, 72/6C, 72/10B, 72/11, 72/16/B/2, 72/17B, and situate at revenue Vadvali Tarfe Varedi, Taluka Karjat and District Raigad and more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "Property"). The Owner has informed me that he owns and holds the said Property free from all encumbrances, claims and demands of any nature.

All persons/ entities including an individual, Hindu Undivided Family, a company, banks, financial institutions, non-banking financial institutions, a firm, an association of persons or a body of individuals whether incorporated or not, lenders and/or creditors having any benefits, titles, claims, objections, demands or rights or interest in respect of the said Property or any part thereof including in any built-up areas constructed and/or to be constructed by way of sale, transfer, share, pledge, exchange, mortgage, gift, lien, trust, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, assignment, charge, bequest, succession, possession, inheritance, easement, license, occupation, encumbrance, family arrangement / settlement, maintenance, trust, decree and/or order of any Court of Law, contracts/agreements, partnership, any arrangement, memorandum of understandings, letter of intent/heads of terms, development rights, right of way, Lis-pendens, reservation, power of attorney, option, FSI consumption, TDR, right of first refusal, pre-emption or any liability or any commitment or otherwise howsoever or of whatsoever nature are hereby required to intimate the same in writing along with documentary evidence to the undersigned at their address at Flat No.101, Pal Tower, Bhisegaon, Tal Karjat, Dist Raigad 410201, within 7 (Seven) days from the date of publication of this notice of such claim, if any, failing which, any such right, title, interest, benefit, claim, demand and/or objection, if any, against the said Owner and/or in respect of the said Property and/or any part/s thereof shall be treated as waived or abandoned.

**SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**
**[Description of the Property]**

All that piece and parcel of agricultural land parcel lying, being and situate at revenue village Vadvali Tarfe Varedi, Taluka Karjat, and District Raigad in the State Maharashtra within the jurisdiction of the Sub-Registrar of Assurances at Karjat having the following descriptions :

| Survey No./ Hissa No. | Area in (H.R.P.) | Assessment (Rs. Ps.) |
|---|---|---|
| 69/16 part | 00-24-00 | 0.13 |
| 72/1B part | 00-44-00 | 0.25 |
| 72/3A | 00-16-00 | 0.14 |
| 72/6Apart | 00-08-27 | 0.10 |
| 72/6B | 00-08-33 | 0.02 |
| 72/6C | 00-40-47 | 0.32 |
| 72/10B | 00-22-00 | 0.10 |
| 72/11 | 00-32-00 | 0.25 |
| 72/16/B/2 | 00-31-00 | 0.15 |
| 72/17B | 00-44-00 | 0.27 |

Date 27 May 2026 Sd/-
**Yadnyesh Bhagwat, Advocate**
Mob No. 9307885711.

### ग्रुप ग्रामपंचायत जासई
**मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड**
**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून वस्तू खरेदी कामी मान्यता प्राप्त पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ. नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. ४ मधिल दिलीप अनंत घरत यांचे घरापासून ते राकेश धनाजी म्हात्रे यांच्या चाळीपर्यंत आर.सी.सी. रस्ता बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २६/२७ अबंधित | ६,८५,६१९/- | ६,८५६/- | ५०० | ६ महिने |
| २ | वॉर्ड क्र. ३ मधिल राजेंद्र म्हात्रे यांचे घरापासून ते संदिप सुभाष म्हात्रे यांचे घरापर्यंत कॉक्रेट गटार बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २६/२७ अबंधित | ५,९९,९२५/- | ५,९९९/- | ५०० | ६ महिने |
| ३ | ग्राम पंचायत जासई अंतर्गत कंपोस्ट पिट बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | ६७,२८८/- | ६७२/- | ५०० | ६ महिने |
| ४ | रांजणपाडा तलावातील विहिर दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | १,४७,४०९/- | १,४७४/- | ५०० | ६ महिने |
| ५ | जासई हद्दीतील दास्तान फाटा येथील स्मशानभुमीला संरक्षण भिंत बांधणे व रंगरंगोटी करणे | ग्रामनिधी | ९,९८,९५२/- | ९,९८९/- | ५०० | ६ महिने |
| ६ | जासई हद्दीतील अंगणवाडी क्र.२ पासून ते मंगल कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याला जोड रस्ता तयार करणे | ग्रामनिधी | १,२७,५१८/- | १,२७५/- | ५०० | ६ महिने |
| ७ | जासई बौद्धवाडीच्या प्रवेश दारापासून ते बौद्धवाडी विहारापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे. | १५% मागासवर्गीय ग्रामनिधी | २,५०,५०३/- | २,५०३/- | ५०० | ६ महिने |
| ८ | ग्राम पंचायत हद्दीतील अंगणवाडी क्र. ३, ४, व ५ ला रेन वॉटर हार्वेस्टींग करणे | ग्रामनिधी | १,५०,०००/- | १,५००/- | ५०० | ६ महिने |
| ९ | वॉर्ड क्र.३ मधिल रंजन काना ठाकुर ते नरेंद्र ठाकुर यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे | ग्रामनिधी | ३,७८,६८६/- | ३,७८६/- | ५०० | ६ महिने |
| १० | ग्राम पंचायत कार्यालयाकरीता इन्वटर खरेदी करणे | ग्रामनिधी | १,००,०००/- | -- | -- | १५ दिवस |

**अटी व शर्ती**

१. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक २७/०५/२०२६ ते ०२/०६/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०३/०६/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदे संदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर खरेदी वस्तूंची किमत हि PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाण: जासई
दिनांक:- २७/०५/२०२६

**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्रुपग्राम पंचायत जासई**
**सरपंच** — **ग्रुप ग्रामपंचायत जासई**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल १ श्री. शिरीष कृष्णा कदम रा. सालोख तर्फे नीड, हनुमान मंदिर जवळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१, २ श्री. बद्रिनाथ बाबुराव शिंदे रा. कष्टकरी नगर, पोस्ट-गुळसुन्दे, पनवेल, जि. रायगड - ४१०२०७. यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन-

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| हालिवली | ३९ | १२ | ०.१६.७० ०.०१.०० एकुण क्षेत्र ०.१७.७० | १.४४ |

सदरील मिळकतीपैकी श्रीमती. गंगुबाई रघुनाथ पालकर हिच्या मालकीच्या अविभक्त हिश्याची म्हणजेच ०.०८.८५ क्षेत्राची विक्री.

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा - कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/ हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

तारीख :- २७/०५/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता- ओम श्रमसाफल्य बिल्डींग
कोतवालनगर - कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

### उपविभागीय अधिकारी, रोहा उपविभाग, रोहा यांच्या न्यायालयात
**जाहीर नोटीस**

आरटीएस विलंबमाफी क्र. १८/२०२६

कै. इंदू रामचंद्र कुडले मयत वारस
१. संदिप रामचंद्र कुडले
२. अनिता अनिल देशमुख
३. मीना नारायण चाळके
४. कै. सुमन दत्तात्रय गोफण मयत
४/अ. संदिप दत्तात्रय गोफण
४/ब. नरेश दत्तात्रय गोफण
४/क. दिलीप दत्तात्रय गोफण — अपिलार्थी
४/ड. ज्योती संजय जाधव
रा.

विरूध्द

कै. खुमाजी मालु दंत मयत कायदेशीर वारस
१. कै. रामचंद्र खुमाजी दंत मयत कायदेशीर वारस
कै. लक्ष्मीबाई रामचंद्र दंत मयत पत्नी
१/अ. कै. गणपत रामचंद्र दंत मयत कायदेशीर वारस
१/अ/अ. गणेश गणपत दंत
१/अ/ब. सुरेखा गणपत दंत
१/ब. कृष्णा रामचंद्र दंत
अ.क्र. १अ/अ ते १/ब रा. भावशेत, आपटवणे, ता. सुधागड, जि. रायगड
१/क. विठाबाई/तारामती हरिश्चंद्र शेडगे
रा. वावे, ता. सुधागड, जि. रायगड
१/ड. चंद्रबाई/अनुराधा नारायण मराठे
रा. भार्जे, ता. सुधागड, जि. रायगड
२. कै. होनाजी खुमाजी दंत मयत कायदेशीर वारस
२/अ. कै. नथुराम होनाजी दंत मयत कायदेशीर वारस — उत्तरार्थी
२/अ/अ. वंदना नथुराम दंत
रा. भावशेत आपटवणे, ता. सुधागड, जि. रायगड
२/अ/ब. राजश्री सुहास जाधव
रा. ८३० शुक्रवार पेठ पुणे ४११००२
२/अ/क. जयश्री विलास भोसले
रा. वाफेघर, ता. सुधागड, जि. रायगड
२/अ/ड. राजेश नथुराम दंत
रा. भावशेत, आपटवणे, ता. सुधागड, जि. रायगड
२/अ/ई. राणी राहुल दगडे
रा. कसबापेठ, अलोकनगरी पुणे
२/ब. कै. शेवंता/सुनंदा होनाजी दंत मयत कायदेशीर वारस
२/ब/अ. सुनील सुनील जामकर
२/ब/ब. रोहिणी रोहिदास मोरे
२/ब/क. रविता रविंद्र साजेकर
२/ब/ड. संतोष सिताराम दळवी
२/ब/अ ते २/ब/ड रा. द्वारा रविता रविंद्र साजेकर, मजरे जांभूळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड
२/ब/इ. दिपा दिनेश जाधव
रा. कचरा डेपोशेजारी, शास्त्रीनगर, कोथरूड,पुणे
२/ब/ई. मानसी महेश वाईत
रा. द्वारा रविता रविंद्र साजेकर, मजरे जांभूळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड
३. कै. कोंडू खुमाजी दंत मयत कायदेशीर वारस
कै. राधिका कोंडू दंत मयत पत्नी कायदेशीर वारस
३/अ. सखाराम कोंडू दंत
रा. भावशेत, आपटवणे, ता.सुधागड, जि.रायगड
३/ब. चंद्रकांत कोंडू दंत
रा. भावशेत, आपटवणे, ता.सुधागड, जि.रायगड
३/क. सुनिता/कुसूम लक्ष्मण शिंदे
रा. राजखलाटी, ता.रोहा जि.रायगड
३/इ. पुष्पा पांडुरंग जाधव
रा. भावशेत आपटवणे, ता. सुधागड, जि. रायगड
४. कै. धनाजी खुमाजी दंत मयत कायदेशीर वारस
४/अ. एकनाथ धनाजी दंत
रा.पिलोसरी, ता.सुधागड, जि.रायगड
४/ब. जगन्नाथ धनाजी दंत
रा.पिलोसरी, ता.सुधागड, जि.रायगड
४/क. सिंधु धनाजी शेडगे रा. वांद्रोशी, — उत्तरार्थी
५. दत्तात्रय खुमाजी दंत मयत कायदेशीर वारस
५/अ. मधुकर दत्तात्रय दंत मयत कायदेशीर वारस
५/अ/अ. कविता मधुकर दंत
५/अ/ब. मनोज मधुकर दंत
५/अ/क. मिनाक्षी मधुकर दंत
५/अ/ड. पुनम मधुकर दंत
अ.क्र. ५/अ/अ ते ५/अ/ड रा. भावशेत, आपटवणे,ता. सुधागड, जि. रायगड
५/ब. यशोदा दत्तात्रय दंत
५/क. सुनिल दत्तात्रय दंत
५/ड. अनिल दत्तात्रय दंत
५/इ. जयवंत दत्तात्रय दंत
५/ई. संतोष दत्तात्रय दंत
५/उ. वैशाली बळीराम ठाकूर
५/ऊ. दिपीका दिलीप पाठारे
५/ब ते ५/ऊ रा. भावशेत आपटवणे, ता. सुधागड, जि. रायगड
६. वसंत सखाराम टाकळेकर मयत तर्फ वारस
६/अ. विनोद वसंत टाकळेकर
६/ब. सुरेखा वसंत टाकळेकर
६/क, विद्या वसंत टाकळेकर
६/ड. विना वसंत टाकळेकर
६/इ. विजा वसंत टाकळेकर
६/ई. वैशाली वसंत टाकळेकर
६/अ ते ६/ई रा. पिलोसरी, ता.सुधागड,जि.रायगड
७. शिवानी शैलेश मालपाणी
मु.पो. आपटवणे पाली हिल, भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
८. विलास भगवंत परूळेकर
रा. मेघाशिष बंगला संत ज्ञानेश्वर रोड, पाचपाखाडी ठाणे, जि. ठाणे ४००६०२
९. सुभाष कुंदनमल परमार
रा. दफेदार गल्ली, मु. पो. पाली, ता. सुधागड, जि. रायगड — उत्तरार्थी
१०. शैलेश विश्वनाथ मालपाणी
मु.पो. आपटवणे पाली हिल, भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
११. विभा शैलेश मालपाणी
मु.पो. आपटवणे पाली हिल, भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
१२. चेरी शैलेश मालपाणी
मु.पो. आपटवणे पाली हिल, भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
१३. ब्रिजमोहन जयकिसन मालपाणी
मु.पो. आपटवणे पाली हिल, भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
१४. सचिन शामसुंदर मालपाणी
मु.पो. आपटवणे पाली हिल, भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
१५. तहसीलदार सुधागड
१६. तलाठी आपटवणे
१७. मंडळ अधिकारी पाली
१८. महाराष्ट्र शासन
१९. सुधीर दत्तात्रय दंत,
रा. भावशेत, ता. सुधागड, जि. रायगड, जि. रायगड

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये मौजे आपटवणे, ता. सुधागड येथील ग.नं. ३४५, ४१८, २९४, ३५०, ४२१, ३३६, २५२, १९७, ३४७, २९८, २९६, २३२, २१३, ३३५, २२५, २९९, २२८, २९०, २६९, २२९, २१८, ३४९, २८८, ३५१, २१४, ३४८, ३५२, ३०७, १८४ व ३३९ या जमीन मिळकतीबाबत फेरफार क्र. ७६५, ५३९, १२२४, ४५६, ४०५, १३२६, ३४४, ३३२, ६०, ६१, ८०, ५४४, ४४२, ५३४, ५१४ व ७४३ च्या विरोधात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक १५/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वत:अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमूद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली असे.
दि.२१/०५/२०२६.

**उपविभागीय अधिकारी**
**रोहा विभाग रोहा**

## निवडक



### जप्त गाड्या रस्त्याखाली ढकलल्या

**चणेरा :** रोहे शहरातील रायकर पार्क परिसरात घडलेल्या एका धक्कादायक प्रकारामुळे प्रशासनासह नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. उत्पादन शुल्क विभागाने दारूबंदी गुन्ह्यांमध्ये जप्त केलेली चारचाकी वाहने अज्ञात व्यक्तीने रात्रीच्या अंधारात जेसीबीच्या सहाय्याने थेट खाली ढकलल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे सरकारी ताब्यातील वाहनांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित विभाग त्या व्यक्तिचा शोध घेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोहे शहरातील मध्यवर्ती रायकर पार्क येथे उत्पादन शुल्क दारूबंदी विभागाचे कार्यालय आहे. या विभागाने दारूच्या विविध गुन्ह्यांमध्ये वापरलेली काही वाहने जप्त करून कार्यालयाशेजारील रस्त्याच्या कडेला उभी केली होती. ही वाहने गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून तेथेच होती. मात्र, सोमवारी (दि.२५) रात्री एका व्यक्तिने जेसीबीच्या साहाय्याने ही वाहने रस्त्यावरून विरुद्ध बाजूस ढकलून दिल्याचे उघड झाले आहे. या घटनेत चार वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. नगरपालिकेकडूनही वाहने हटवण्याबाबत कोणतीही सूचना देण्यात आली नव्हती. त्यामुळे अचानक हा प्रकार का घडवून आणला गेला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेमुळे भविष्यात न्यायालयाच्या आदेशाने संबंधित वाहनमालकांना वाहने परत देण्यात आली, तर नुकसानभरपाईची जबाबदारी कोण घेणार? असा सवालही उत्पादन शुल्क विभागासमोर उभा ठाकला आहे. दरम्यान, ही वाहने रोह्यातील एका तरुण राजकीय व्यक्तीच्या सांगण्यावरून हटवण्यात आल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

### महावितरण विरोधात आंदोलन



**रसायनी :** सातत्याने होणाऱ्या विजेच्या लपंडावामुळे त्रस्त झालेल्या व्यापारी असो.ने सोमवारी (दि.२४) मोहोपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बाजारपेठ बंद ठेवून ठिय्या आंदोलन केले होते. या आंदोलनाला सर्वपक्षीयांनी पाठींबा दर्शविला. मोहोपाडा, नवीन पोसरी बाजारपेठ व परिसरात दिवसा आणि रात्रीही वारंवार वीज खंडित होत असल्याने प्रामुख्याने व्यापारी, हॉस्पिटल आणि छोटे व्यावसायिकांना मनस्तापासह आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे संतप्त विज ग्राहकांनी अनेकदा मोहोपाडा वीजवितरण शाखेला वेळोवेळी वारंवार विद्युतपुरवठा खंडित होण्याबाबत आणि इतर तक्रारींबाबत अवगत केले होते. त्याची गांभीर्याने दखल न घेतल्याने निवेदनात सांगितल्याप्रमाणे सोमवारी आंदोलन करण्यात आले. यावेळी सर्वपक्षीय, पत्रकार, नागरिक व सेवाभावी संघटनांचा पाठिंबा मिळाला. यावेळी महावितरण आवश्यक ती उपाययोजना तत्काळ सुरू करत आहे. प्रलंबित मेंटेनन्सची कामे आठ ते दहा दिवसांत करण्यात येतील. वीजपुरवठा सुरळीत व अखंडित राहावा, यासाठी तांत्रिक कामे सत्वर करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

### कार्यालयांना प्लॅस्टिकचा आधार



**कोर्लई :** गेल्या काही वर्षांपासून पावसाळा सुरु होताच मुरुड मधील शासकिय कार्यालयांत होणाऱ्या गळतीला उपाय म्हणून छतावर प्लॅस्टिकचा वापर केला जातो आहे. यंदाही कार्यालयाच्या इमारतींना प्लॅस्टिकचा वापर केला जात असल्याने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी बासनात गुंडाळल्याचे समोर येत आहे. मुरुड शहर हे तालुक्याचे ठिकाण आहे. त्यामुळे या ठिकाणी तहसीलदार कार्यालय, वनविभाग, पंचायत समिती, सेतू, ग्रामीण रुग्णालय विविध कार्यालये असून, काही कार्यालयात महत्त्वाचे दस्तावेज असतात. शहरासह तालुक्यातील विविध ठिकाणांहून शासकीय कामासाठी लोकांची लगबग असते. गेल्या काही वर्षांपासून पावसाळा सुरू झाला की, येथील कार्यालयांच्या गळतीला सुरुवात होते. त्यावर उपाय म्हणून प्लॅस्टिकचा वापर केला जातो. त्यामुळे शासकीय कार्यालयांच्या गळतीला प्लॅस्टिकचा वापर केला जात असल्याने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी बासनात गुंडाळल्याचे चित्र दिसून येत आहे.



● नवी मुंबई येथे नुकतेच आलेल्या गुलाबी फ्लेमिंगो पक्ष्यांना उडताना पाहण्याचा आनंद काही वेगळाच आहे. लाखोंच्या संख्येने आलेले हे पक्षी अन्न शोधण्यासाठी भरती-ओहोटीच्यावेळी येत जात असतात. (छायाचित्र: सुधीर नाझरे)

# स्मार्ट मीटरमुळे वीजबिलाचा शॉक

## ।। बिलं अचानक दुप्पट-तिप्पट वाढल्याची तक्रार ।। नागरिकांत संतापाची लाट

| सलीम शेख |
| माणगाव |

महागाईच्या झळांनी आधीच होरपळलेल्या सर्वसामान्य नागरिकांना आता वीजबिलाच्या वाढत्या आकड्यांनी अक्षरशः हादरवून सोडले आहे. राज्यभरात स्मार्ट मीटर बसविण्याचे काम वेगाने सुरू असताना अनेक ग्राहकांनी वीजबिल अचानक दुप्पट-तिप्पट वाढल्याची तक्रार केली आहे. घरातील वीज वापर पूर्वीइतकाच असतानाही हजारो रुपयांचे वाढीव बिल हातात पडत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



महावितरणकडून "स्मार्ट मीटर अधिक अचूक आहेत" असा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात सामान्य ग्राहकांना त्याचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. माणगावसह रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भाग आणि शहरांतून वाढीव वीजबिलाबाबत तक्रारींचा पाऊस पडत आहे.काही ग्राहकांनी सांगितले की, पूर्वी १००० ते १५०० रुपयांच्या दरम्यान येणारे वीजबिल आता थेट ३००० ते ४००० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. विशेष म्हणजे घरात नवीन उपकरणे वापरात नसतानाही बिलात प्रचंड वाढ झाल्याने नागरिक संभ्रमात पडले आहेत. एका संतप्त ग्राहकाने प्रतिक्रिया देताना सांगितले की, "आमचा वीज वापर पूर्वीसारखाच आहे. तरीही स्मार्ट मीटर बसवल्यानंतर बिल अचानक वाढले. मग एवढ्या वर्षांपासून आम्ही चुकीचे बिल भरत होतो का?" अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

महावितरण अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जुने मीटर अनेकदा सदोष किंवा मंद गतीने चालत होते. त्यामुळे प्रत्यक्ष वापरापेक्षा कमी बिल आकारले जात होते. स्मार्ट मीटरमुळे आता अचूक नोंद होत असल्याने बिल वाढल्याचे दिसत आहे. मात्र, ग्राहकांना हा युक्तिवाद मान्य नाही. कारण अनेकांच्या मते, जर जुनी यंत्रणा चुकीची होती तर त्याची जबाबदारी ग्राहकांवर का टाकली जात आहे? "मीटर बदलला आणि बिल वाढले" हा अनुभव इतक्या मोठ्या प्रमाणावर येत असल्याने नागरिकांनी पारदर्शक चौकशीची मागणी केली आहे. वीजबिल शून्यावर आणण्यासाठी लाखो रुपये खर्च करून सोलर प्रणाली बसविणाऱ्या ग्राहकांनाही आता धक्का बसू लागला आहे.

प्रणालीत बदल, स्थिर आकार आणि इतर शुल्क वाढल्यामुळे सौर ऊर्जा वापरूनही अपेक्षित बचत होत नसल्याची तक्रार समोर आली आहे. पूर्वी "सोलर बसवा आणि वीजबिलातून मुक्त व्हा" असा विश्वास नागरिकांना देण्यात आला होता. मात्र, आता अनेकांना निश्चित शुल्क, कर आणि अतिरिक्त आकारणीमुळे पुन्हा वाढीव बिल भरावे लागत असल्याचे दिसून येत आहे. सामान्य ग्राहकांना फक्त वापरलेल्या विजेचे पैसे भरावे लागतात, अशी धारणा असते. परंतु, प्रत्यक्षात वीजबिलामध्ये विविध प्रकारचे कर, स्थिर आकार, इंधन समायोजन आकार, वहन खर्च आणि इतर शुल्कांचा समावेश असतो. त्यामुळे कमी वापर असूनही बिलाचा आकडा मोठा दिसतो. स्थिर आकार, इंधन समायोजन आकार, वहन शुल्क, वीज कर व इतर अधिभार या शुल्कांमुळे ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री लागत असल्याचे स्पष्ट होत आहे.

अनेक नागरिकांनी सरकार आणि महावितरणने स्मार्ट मीटर धोरणाचा फेरविचार करावा, वीजबिलातील अतिरिक्त आकारांबाबत पारदर्शकता आणावी आणि ग्राहकांच्या शंकांचे समाधान करण्यासाठी विशेष यंत्रणा उभी करावी, अशी मागणी केली आहे. स्मार्ट मीटर बसवल्यानंतरच बिल वाढ का? अतिरिक्त शुल्कांचा भार सामान्य ग्राहकांनीच का सहन करावा? सोलर बसवूनही अपेक्षित बचत का होत नाही? स्मार्ट मीटरची स्वतंत्र तांत्रिक तपासणी होणार का? वीज ही आजच्या काळातील मूलभूत गरज बनली आहे. त्यामुळे "अचूक मोजणी"च्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक अन्याय होणार नाही ना, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

### सर्वसामान्यांचे आर्थिक बजेट कोलमडले

इलेक्ट्रिकल कंत्राटदार संघटनांनी काही ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेवर ग्राहकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ग्राहकांना पुरेशी माहिती न देता आणि तांत्रिक बाबी समजावून न सांगता मीटर बदलले जात असल्याचा आरोप केला जात आहे. ग्राहकांचे म्हणणे आहे की, स्मार्ट मीटरमुळे प्रत्येक क्षणाचा वापर नोंदवला जातो. त्यामुळे विजेचा वापर अधिक बारकाईने मोजला जात असला, तरी त्याचा आर्थिक ताण सर्वसामान्यांवर वाढत चालला आहे. गॅस, पेट्रोल, शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजांच्या वाढत्या खर्चामुळे सामान्य माणूस आधीच त्रस्त आहे. त्यात आता वाढीव वीजबिलामुळे घरगुती बजेट कोसळत असल्याचे चित्र आहे. गरीब, मध्यमवर्गीय आणि सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक बनली आहे.

### रागातून मारहाण

**नवीन पनवेल :** "सिगारेट पिऊ नका" असे बोलल्याने दोघांना शिवीगाळ करत हाता बुक्क्याने मारहाण केल्याची घटना रविवारी (दि.२४) खारघर येथे घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. जेहेब नाझीर कच्ची पनवेल येथे राहत असून, ते त्यांच्या कुटुंबासह ॲप्पल मेंट या हॉटेलच्या बाहेर जेवण करत बसले होते. यावेळी एक व्यक्ती त्या ठिकाणी सिगारेट पीत होते. त्यांनी त्यांना "या ठिकाणी सिगारेट पिऊ नका", असे बोलले असता सिगारेट पिणाऱ्या व्यक्तिला राग आला. त्याने जेहेर कच्ची आणि त्यांच्या पत्नीला शिवीगाळ केली आणि जेहेब यांना हाताबुक्क्यांनी मारहाण करून बघून घेण्याची धमकी दिली.

## महाडमधील दिव्यांगांचा उपोषणाचा इशारा

| महाड | प्रतिनिधी |

शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण अर्थसंकल्पातून (उत्पन्नापैकी) ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र, महाड नगर परिषदेकडून शिल्लकी अर्थसंकल्पातून (बांधील खर्च वगळून उर्वरित रकमेतून) ५ टक्के निधी दिला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. ही पद्धत शासन निर्णयाच्या उद्देशास बाधक असून दिव्यांग बांधवांवर अन्यायकारक आहे. त्यामुळे महाड शहरातील दिव्यांग बांधवांनी मंगळवारी (दि.२६) त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरोधात अन्नत्याग उपोषण करण्याबाबत महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोलेकर यांना निवेदन दिले आहे.



शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण अर्थसंकल्पातून ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. परंतु, दिव्यांगांसाठी या राखीव निधीचीयोग्य अंमलबजावणीकरण्यात येत नाही. महाड नगरपरिषदेकडून शिल्लकी अर्थसंकल्पातून निधी दिला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. ही पद्धत शासन निर्णयाच्या उद्देशास बाधक असून दिव्यांग बांधवांवर अन्यायकारक आहे. या संदर्भात गेल्या ३ वर्षांपासून अनेक वेळा निवेदने, पत्रव्यवहार व बैठका घेण्यात आल्या; परंतु, आजपर्यंत कोणतीही न्याय्य व ठोस कार्यवाही झालेली नाही. महाडमधील अनेक सुशिक्षित व पात्र दिव्यांग व्यक्ती बेरोजगार आहेत. शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी टपरी, स्टॉल अथवा लघु उद्योग सुरू करण्यासाठी २०० चौ. फूट जागा उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. तरी पात्र दिव्यांग व्यक्तींना नियमबद्ध व पारदर्शक पद्धतीने जागा उपलब्ध करून देण्यात यावी. नगरपरिषदेकडून स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते; परंतु, प्रत्यक्षात शहरात अनेक दुकाने, टपऱ्या, हातगाड्या व इतर व्यवसाय अनधिकृतरीत्या सुरू असल्याचे दिसून येते. त्यामुळे दिव्यांगांबाबत दुजाभाव केला जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. या संदर्भात वारंवार लेखी तक्रारी व निवेदने देऊनही नगर परिषद प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने, या अन्यायाविरोधात दि.१५ जून रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून महाड नगरपरिषद आवारात बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणयाबाबत निवेदन महाड शहरातील दिव्यांग बांधवांनी दिला आहे.

### कारची काच फोडून रोख रक्कम चोरली

**नवीन पनवेल :** कारची काच फोडून १ लाख २० हजार रुपये आणि सही केलेला कोरा चेक चोरून नेल्याची घटना खारघर सेक्टर १३ येथे घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, मकबूल दिनवारे हे तळोजा फेस १ येथे राहत असून, त्यांनी त्यांची कार ग्लोबल खारघर सेक्टर १३ येथील इंटरनॅशनल स्कूलच्या गेट समोर रस्त्याच्या बाजूला पार्क केली होती. चोराने ड्रायव्हर सीटच्या मागील उजव्या बाजूच्या दरवाजाची काच फोडून १ लाख २० हजार रुपये चोरले आणि चेक चोरून नेला.

### ३३ लाखांची केली फसवणूक

**नवीन पनवेल :** भागीदारीत घेतलेला फ्लॅट परस्पर विकून आलेली रक्कम स्वतःच्या खात्यात घेऊन ३३ लाखांची फसवणूक केल्या प्रकरणी प्रदीप धोंडीराम पाटील याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील संजय यशवंत परदेशी हे करंजाडे येथे राहत असून, त्यांनी प्रदीप पाटील यांच्या भागीदारीमध्ये इमारत विकसित करण्यासाठी घेतली होती. २०२३ ते २०२६ पर्यंत त्यांनी भागीदारीमध्ये विकसित करण्यासाठी घेतलेल्या साई दर्शन बिल्डिंग करंजाडे या इमारतीतील फ्लॅट संजय परदेशी यांच्या परस्पर विकून आलेले ३३ लाख रुपये ही भागीदार फर्मच्या नावे असलेल्या खात्यात न घेता स्वतःच्या खात्यात घेऊन संजय परदेशी यांची फसवणूक केली.

## माथेरानच्या नगराध्यक्षांच्या प्रयत्नांना यश

| नेरळ-माथेरान | प्रतिनिधी |

माथेरान मधील पर्यटन हंगामात पाण्याच्या पुरवठ्याबाबत हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग व्यावसायिक आणि स्थानिकांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत याची काळजी घेतली जाईल, असे स्पष्ट आश्वासन कार्यकारी अभियंता एस.पी. वेंगुर्लेकर यांनी दिले आहे. माथेरानसाठी एक नवीन पंप कार्यान्वित होणार असून, दि.१० जूनपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे शाखा अभियंता तसेच मेंटेनेस टीम माथेरानमध्ये तैनात असणार आहे. असे स्पष्ट आश्वासन कार्यकारी अभियंता यांनी दिले आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्याकडून पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. आज सकाळी ही पंप नेरळ माथेरान घाट येथे पोहचले आहे.

माथेरानसाठी कुंभे येथे असलेल्या पंप हाउसमध्ये येथील उल्हास नदीतील पाणी उचलले जाते. या मार्गावर असलेले पाण्याची गळती आणि तीन ठिकाणी असलेले पंप हाउस यामुळे पाण्याचा पुरवठा कमी दाबाने होत होता. त्यात वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर पाणी पोहचवण्यात अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन तीनही पंप हाउस येथे स्टँड बाय स्वरूपात नवीन पंप उपलब्ध ठेवण्यासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांचे प्रयत्न सुरू होते.

अनेक समस्या आ वासून उभ्या | लोकप्रतिनिधींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

# माथेरानकर मूलभूत सेवासुविधेपासून वंचित

| माथेरान | मुकुंद रांजाणे |

महाराष्ट्र राज्यातील माथेरान हे एकमेव पर्यटनस्थळ असावे की, याठिकाणी अनेक सेवासुविधा आजमितीपर्यंत पुर्ण होऊ शकलेल्या नाहीत. लोकप्रतिनिधी येथील मतदान संख्येमुळेच स्थानिक रहिवाशांच्या समस्यांकडे ढुंकूनही पहात नाहीत. केवळ निवडणूकीच्या वेळेस नाममात्र आश्वासनांची बरसात होत असते; परंतु, प्रत्यक्षात निवडून आल्यावर ही मंडळी नेहमीच कानाडोळा करताना दिसतात. त्यामुळे आजही येथील सर्वसामान्य व्यापारी आणि कष्टकरी आपले संघर्षमय जीवन जगताना दिसत आहे. पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या या गावाला विकासाकडे नेण्यासाठी जबाबदार लोकप्रतिनिधी दुर्लक्षच करीत आहेत. त्यामुळेच अनेक समस्या आजही आ वासून स्थानिकांसमोर उभ्या आहेत.



माथेरान या पर्यटनस्थळाकडे जबाबदार लोकप्रतिनिधींचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. केवळ अल्प मतदान संख्येमुळेच कुणीही येथील पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या रहिवासांच्या समस्यांकडे ढुंकूनही पहात नाहीत. दर पाच वर्षांनी विधानसभा, लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या काळात पंधराशे मते एकाच उमेदवाराला मिळत असतात. त्यामुळे निवडणूक वेळेस केवळ नाममात्र आश्वासनांची बरसात होत असते; परंतु, प्रत्यक्षात निवडून आल्यावर ही मंडळी नेहमीच कानाडोळा करताना दिसतात. त्यामुळेच आजही येथील सर्वसामान्य व्यापारी आणि एखादा कष्टकरी आपले संघर्षमय जीवन जगत आहे. पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या या गावाला विकासाकडे नेण्यासाठी जबाबदार लोकप्रतिनिधी दुर्लक्षच करीत आलेले आहेत.

मागील अनेक वर्षांपासून येथील मिनीबस सेवा डबघाईला आलेली असताना साध्या दोन नवीन बसेस उपलब्ध होऊ शकत नाहीत. मिनिबस अनेकदा घाटात बस बंद पडत असते. तरीसुद्धा स्वस्त प्रवासाच्या दृष्टीने प्रवासी जीव मुठीत धरून या घाटरस्त्यातून मार्गक्रमण करत आहेत. माथेरानला होणारा वाढीव पाणी पुरवठा नेरळच्या उल्हास नदीतून होत असतो. परंतु, अनेक वर्षांपासून याठिकाणी पाण्याच्या पंपाची दुरुस्ती केली जात नसून, ऐन सुट्ट्यांच्या हंगामात पाणी समस्या उद्‌भवली असल्याने त्याचा परिणाम एकंदरीत येथील पर्यटनावर होताना दिसत आहे. तसेच, सुप्रीम कोर्टाकडून येथील रस्त्यांची दुरुस्ती करावी, असे स्पष्ट निर्देश असतानाही राजकीय आकसापोटी ठराविक लोकांची मर्जी राखण्यासाठी विकास कामे पूर्ण केली जात नाहीत. तसेच, पर्यावरणपूरक ई-रिक्षांची संख्या खूपच कमी असल्याने स्थानिकांसह पर्यटकांची हेळसांड होत आहे. तसेच, पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या मिनिट्रेन बाबतीत आजही गांभीर्याने विचार केला जात नाही. पूर्वी नेरळहुन माथेरानला येण्यासाठी ट्रेनच्या ६ फेऱ्या व्हायच्या. परंतु, आजच्या घडीला केवळ २ फेऱ्या होत आहेत. बहुतेक पर्यटक खासकरून मिनिट्रेन मधून प्रवास करण्याच्या उद्देशाने येत असतात; परंतु, तिकीट उपलब्ध न झाल्याने त्यांचा देखील हिरमोड होत आहे. जोपर्यंत येथील राजकीय पक्षांनी अल्प मतदारांना गोंजारण्यात वेळ व्यर्थ घालविण्यापेक्षा विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून सकारात्मक भूमिका घेतली, तर निश्चितच हे पर्यटनस्थळ नावारूपाला येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## प्रशासनकाडून विकासकाला पाठीशी घालण्याचा घाट?

| पेण | प्रतिनिधी |

पेण नगरपरिषदेकडून शहरातील गटार आणि नाल्यांच्या साफसफाईसंदर्भात नुकताच विशेष दौरा आयोजित करण्यात आला होता. नगराध्यक्षांनी घटनास्थळीच बांधकाम अभियंता यांना देत, येत्या ८ दिवसांत हा नाला पूर्णपणे मोकळा झाला पाहिजे, असे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, तब्बल १३ दिवस उलटूनही या ठिकाणी कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे पालिका प्रशासन विकासकाला पाठीशी घालत असल्याचा संशय स्थानिकांमधून व्यक्त केला जात आहे.

पेण शहरातील गटार आणि नाल्यांच्या साफसफाईसंदर्भातील विशेष दौऱ्यावेळी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, सभापती कलावती पाटील, सभापती आफ्रीन अखवारे तसेच मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी संयुक्तपणे शहरातील विविध भागांची पाहणी केली. यावेळी बोरगाव रोड परिसरातील एका नाल्यावर विकासकाने अतिक्रमण करून संपूर्ण इमारतीच्या टॉयलेट व बाथरूमच्या टाक्या बांधल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे नाल्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे अडथळला गेला असून, पावसाळ्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. घटनास्थळीच नगराध्यक्षांनी बांधकाम अभियंता सुहास कांबळे यांना तातडीने आदेश देत, येत्या ८ दिवसांत हा नाला पूर्णपणे मोकळा झाला पाहिजे, असे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, तब्बल १३ दिवस उलटूनही संबंधित ठिकाणी कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे दिसून येत आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-28



# त्यांच्या संतापाचा अर्थ

सरन्यायाधीश म्हणाले, बेकार तरुण हे झुरळांसारखे आणि दुसऱ्यांवर जगणाऱ्या किड्यांसारखे असतात. ते मिडियामध्ये आणि सोशल मिडियात म्हणजे फेसबुक, व्हॉटसॅप, एक्स वगैरेंर येऊन काहीही बोलत राहतात. त्यांच्या या उद्गारांवर गदारोळ झाला. न्यायमूर्तींनी आपल्या विधानाचा गैरअर्थ काढल्याचा दावा केला. पण बाण निघून गेला होता. कॉक्रोच जनता पार्टी नावाने सोशल मिडियामध्ये एक पक्ष स्थापन झाला. आधी लोकांना वाटले की ही तात्कालिक प्रतिक्रिया असेल. सोशल मिडियातला तरुणांचा प्रॅक्टिकल जोक असेल. पण ते प्रकरण आता गंभीर होऊ लागले आहे. त्यामुळे या पक्षाचे भवितव्य काय याची चर्चा सध्या चालू आहे. गेल्या पन्नास वर्षांमध्ये सत्ताधाऱ्यांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या पक्षांनी इतकी निराशा केली आहे की सर्वसामान्य माणूस अशा कोणत्याही नव्या पक्षाकडे साशंकतेनेच पाहतो. हे असे तात्कालिक उठाव आणि नंतर त्यांच्या नेत्यांचे अधःपतन हे सालोसाल घडत आले आहे. समाजवादी व पुरोगामी नेते जनता पक्षात गेले, पण नंतर ते बाजूला पडून त्यातून भाजपच बलवान झाला. राजा नही फकीर है, देश की ये लकीर है असे म्हणत विश्वनाथप्रताप सिंग यांनी देशातून भ्रष्टाचार हटवण्याचा नारा दिला. पण नंतर ते देवीलाल, चंद्रशेखर वगैरेंच्या राजकारणात अडकून नाहीसे झाले. अण्णा हजारे, केजरीवाल यांनी राजकारण करायचे नाही असे म्हणत उपोषणे वगैरे केली. त्यातून नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. अण्णा अडगळीत पडले. केजरीवालांनी आपल्याच प्रशांत भूषण, योगेंद्र यादव वगैर सहकाऱ्यांना पक्षाबाहेर फेकले. सत्तेत असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. पंजाब सोडता त्यांचा पक्ष आज गलितगात्र अवस्थेत आहे. झुरळ जनता पार्टी स्थापन करणारा अभिजित दीपके हा मनिष सिसोदियांचा सेक्रेटरी होता. आम आदमी पक्षाच्या मिडिया विभागात त्याने काम केले आहे. अमेरिकेत सध्या तो पब्लिक रिलेशन्स या विषयाची पदवी घेण्यास गेला आहे. त्यामुळे मिडिया कसा वापरायचा याचे चांगले ज्ञान त्याला आहे. त्याचाच उपयोग करून त्याने दोन दिवसात दोन कोटी फॉलोअर्स मिळवले आहेत.

## शेतकऱ्यांची चीड

पण झुरळ जनता पार्टीला मिळालेला पाठिंबा म्हणजे निव्वळ सोशल मिडियातला बुडबुडा नाही. या पक्षाला समर्थन किंवा पाठिंबा देणारे जे कोट्यवधी लोक आहेत ते सगळेच फेक किंवा प्रसिद्धीला भुललेले येडे आहेत असे म्हणणे चुकीचे ठरेल. निव्वळ पैसे किंवा काही गिमिक वा टेक्निकच्या आधारे सोशल मिडियातल्या सर्व गोष्टी यशस्वी करता येत नाहीत. तसे असते तर टाटा, अंबानी किंवा अदानी अशा पैसेवाल्यांचेच इथे राज्य असते. पैसे फेकून त्यांनी जगातले सर्वोत्तम जाहिरातवाले मिळवले असते व आपल्या यच्चयावत आयडिया यशस्वी केल्या असत्या. पण तसे होत नाही. प्रत्यक्ष त्या मूळ कल्पनतेही दम असावा लागतो. झुरळ जनता पार्टीमागे इतके लोक जमा झाले याचे कारण त्यांच्यात कसला तरी संताप आहे. तो समजून घ्यावा लागेल. या संतापामुळे भारताच्या व्यवस्थेत लगेच बदल होणार आहे किंवा नरेंद्र मोदींचे सरकार उलथून पडणार आहे असे अजिबात नाही. विरोधी पक्षांना याचा फायदा होईल असेही नव्हे. पण हे घडले नाही म्हणून झुरळ जनता पार्टीमागची खदखद खोटी ठरणार नाही. ती एकाच नव्हे तर शेकडो कारणांनी निर्माण झालेली आहे. ही खदखद कोण्या एका वर्गाची किंवा गटाची नाही. आज फक्त महाराष्ट्रापुरता विचार केला तरी सर्व प्रकारचे शेतकरी अडचणीत आहेत. कांद्याचे भाव रसातळाला गेलेले आहेत. सहाशे किलो कांदा विकून तीनशे रुपये हाती येत आहेत. शेतकऱ्यांना उलटी पट्टी भरावी लागत आहे. यांना मदत होण्यासाठी सरकार कोणतेही उपाय योजायला तयार नाही. कालच सरकारने कांदा खरेदी दरात तीन रुपये ४५ पैशांची वाढ केली. यामुळे प्रतिकिलो १५ रुपये ८० पैसे दराने कांदा खरेदी होईल. किमान १८ ते २० रुपये इतका भाव मिळाल्याखेरीज कांद्याचे पीक परवडत नाही असा शेतकऱ्यांचा अनुभव व दावा आहे. याचा अर्थ शेतकऱ्यांची मेहनत पाण्यात शिवाय, त्यांच्यावर कर्जाचा व तोट्याचा डोंगर कोसळलेला आहे. हा तोटा त्यांनी कसा सहन करायचा हे त्यांचे त्यांनी ठरवावे असे सरकारचे म्हणणे आहे.

## फक्त नीटचे विद्यार्थी नव्हेत

हे केवळ कांद्याच्या बाबतीत नव्हे. ऊस, कापूस, सोयाबीन, आंबा, काजू सर्व नगदी पिकांच्या बाबत हे खरे आहे. याखेरीज शेतकऱ्यांवर दर काही दिवसांनी नवनवीन संकटे येऊन आदळत असतात. सध्या डिझेलची जमवाजमव कुठून करायची असा पेच त्यांच्यासमोर आहे. डिझेलचे भाव तर वाढलेले आहेतच. शिवाय गावोगाव ते मिळेनासेही झाले आहे. त्यासाठी पंपांवर दिवसचे दिवस रांगा लावाव्या लागत आहेत. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांचे सरकार मात्र शेतकरीच काळाबाजार करतात असा अप्रत्यक्ष आरोप करत आहेत. वास्तविक राज्य व केंद्र सरकारच्या सर्व यंत्रणा भाजपकडे आहेत. तेल कंपन्याही सरकारी आहेत. गावोगाव भाजपचे कार्यकर्ते आहेत. जर काळाबाजार होत असेल तर तो तात्काळ रोखणे व गुन्हेगारांना पकडणे हे फडणवीस सरकारला सहज शक्य आहे. ते न करता नुसत्या धमक्या देणे व काळाबाजार होत आहे अशा आवया उठवणे सध्या चालू आहे. डिझेलच्या भाववाढीबाबत किंवा टंचाईबाबत कोणी बोंब मारू नये यासाठी सरकार हे करते आहे असा संशय घ्यायला पुरेशी जागा आहे. ग्रामीण भागात खरे काय ते सर्वांनाच ठाऊक आहे. साहजिकच या गोष्टीवरून शेतकरी व ग्रामीण समाजात मोठा संताप असणार हे उघड आहे. झुरळ जनता पार्टीला मिळालेल्या पाठिंब्यात याचा अंश नक्की आहे. आज सोशल मिडियामध्ये केवळ शहरातले तरुण किंवा कॉर्पोरेटमध्ये नोकऱ्या करणारे लोक वावरतात हा गैरसमज आहे. अगदी खेड्यापाड्यातले मजूर, रिक्षावाले, शेतकरी, बायका, मच्छिमार सर्व जण सोशल मिडियाच्या सर्व साधनांचा वापर करतात. त्यांना अडाणी समजण्याचे कारण नाही. दुसरीकडे माशांचा दुष्काळ, डिझेलची महागाई, पर्ससीन नेटवाल्यांची दांडगाई यांमुळे कावलेले मच्छिमार, शक्तिपीठांपासून ते रायगडमधल्या उद्योगांपर्यंत विविध प्रकल्पांच्या नावाखाली जमिनी काढून घेतल्याने वैतागलेले तरुण, सततच्या अत्याचारांमुळे भीतीच्या छायेत राहणाऱ्या महिला असे अनेक घटक या संतप्तांमध्ये सहभागी आहेत. नीटची परीक्षा रद्द झाल्यामुळे वैतागलेले विद्यार्थी सध्या सर्वांच्या डोळ्यापुढे आहेत. पण कितीही मार्क मिळवले तरी हवा तिथे प्रवेश न मिळणारे, प्रचंड फी भरू न शकणारे किंवा नंतर डिग्री घेऊनही नोकरी न मिळणारे असे कोट्यवधी तरुणही चिडलेले आहेत. आज पंतप्रधान लोकांना सार्वजनिक वाहनांनी प्रवास करण्याचे आवाहन करीत आहेत. पण कोणत्याही शहरातील मेट्रो भयंकर महाग आहे. शिवाय ती हवी अत्यंत गैरसोयीची आहे. बाकी एसटीचा बोजवारा उडाला आहे. मुंबईच नव्हे तर पुणे व इतर शहरांतही कामावर जाण्यायेण्यासाठी लोकांना दोन तीन तास घालवावे लागत आहेत. हे सर्व घटक वैतागलेले आहेत. झुरळ जनता पार्टीमध्ये असा अनेकांचा संताप दडलेला आहे.

विचार

# भारतीय रेल्वेची धडाकेबाज योजना

*गेल्या काही वर्षांमध्ये देशात औद्योगिक उत्पादन, कोळसा वाहतूक, बंदरांमधील मालवाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्यामुळे रेल्वेच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर भारतीय रेल्वे खासगी क्षेत्राच्या सहभागातून सहा नवीन रेल्वे प्रकल्प उभारण्याच्या योजना राबवत आहे. हा निर्णय भारतीय रेल्वेच्या धोरणात्मक बदलाचे संकेत देणारा मानला जात आहे.*



प्रा. सुखदेव बखळे

दीर्घकाळ भारतीय रेल्वेचा विस्तार मुख्यतः सरकारी निधीवर आधारित होता; मात्र वाढत्या लोकसंख्येचा दबाव, औद्योगिक वाढ आणि पायाभूत सुविधांवरील वाढती मागणी पाहता केवळ सरकारी निधीवर रेल्वेचा विस्तार करणे कठीण होत चालले आहे. केंद्र सरकारसमोर आरोग्य, शिक्षण, संरक्षण, ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण आणि शहरी पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत रेल्वे क्षेत्रात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू झाला आहे. रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी मिळवलेल्या सहा प्रकल्पांमध्ये मुख्यतः मालवाहतुकीसाठीचे रेल्वे कॉरिडॉर उभारले जाणार आहेत. चार कोळसा वाहतूक कॉरिडॉर, एक बॉक्साइट वाहतूक मार्ग आणि एक लोखंड धातू वाहतूक कॉरिडॉर या योजनांमध्ये समाविष्ट आहेत. या सर्व प्रकल्पांची एकत्रित लांबी सुमारे ६४० किलोमीटर असेल. हे मार्ग विशेषतः खाण, ऊर्जा आणि अवजड उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. भारतातील वीजनिर्मिती मोठ्या प्रमाणात कोळशावर आधारित आहे. देशातील अनेक वीज प्रकल्पांना वेळेवर कोळसा पोहोचवण्यात रेल्वेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनेकदा कोळसा वाहतुकीतील अडचणींमुळे वीजनिर्मितीवर परिणाम होतो. त्यामुळे स्वतंत्र मालवाहतूक कॉरिडॉर उभारल्यास कोळसा वाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम होऊ शकते. त्याचप्रमाणे बॉक्साइट आणि लोखंड धातू वाहतुकीमुळे स्टील आणि धातू उद्योगालाही मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पांची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ते सार्वजनिक-खासगी भागीदारी अर्थात 'पीपीपी' मॉडेलवर उभारले जाणार आहेत.

रेल्वे क्षेत्रात याआधीही 'पीपीपी' मॉडेलचे प्रयोग झाले होते; पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नव्हते. खासगी कंपन्यांनी गुंतवणुकीबाबत फारसा उत्साह दाखवला नव्हता. यामागील प्रमुख कारण म्हणजे मोठा आर्थिक धोका, जमीन अधिग्रहणातील अडचणी आणि दीर्घकालीन परताव्याबाबतची अनिश्चितता. या वेळी मात्र रेल्वे मंत्रालयाने काही महत्त्वाचे बदल केले आहेत. सर्वप्रथम, प्रकल्पांचा सवलत कालावधी ५० वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजे खासगी कंपन्यांना दीर्घकाळ महसूल मिळवण्याची संधी असेल. दुसरे म्हणजे, जमीन अधिग्रहणाची जबाबदारी रेल्वे स्वतः घेणार आहे. भारतात पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जमीन अधिग्रहण हा सर्वात मोठा अडथळा मानला जातो. त्यामुळे खासगी गुंतवणूकदारांवरील धोका कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सरकार 'व्हायेबिलिटी गॅप फंडिग' मॉडेलही वापरणार आहे. या अंतर्गत प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य रहावेत, म्हणून सरकार काही प्रमाणात आर्थिक मदत देईल. ही मदत प्रकल्प खर्चाच्या कमाल ४० टक्क्यांपर्यंत असू शकते. यामुळे खासगी क्षेत्रासाठी गुंतवणूक अधिक आकर्षक बनण्याची शक्यता आहे. हा निर्णय भारतीय रेल्वेच्या दीर्घकालीन धोरणाशीही जोडलेला आहे. रेल्वेने 'मिशन ३०००' अंतर्गत २०३० पर्यंत वार्षिक मालवाहतूक क्षमता ३००० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारतात रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वे मालवाहतूक स्वस्त आणि पर्यावरणपूरक मानली जाते. त्यामुळे लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी रेल्वेचा वापर वाढवणे आवश्यक मानले जात आहे.

भारतामध्ये सध्या उद्योगक्षेत्राला उच्च लॉजिस्टिक्स खर्चाचा सामना करावा लागतो. अनेक विकसित देशांमध्ये लॉजिस्टिक्स खर्च जीडीपीच्या तुलनेत कमी असतो; पण भारतात तो तुलनेने जास्त आहे. याचा परिणाम भारतीय उद्योगांच्या स्पर्धात्मकतेवर होतो. रेल्वे मालवाहतूक अधिक वेगवान आणि कार्यक्षम झाल्यास उद्योगांच्या वाहतूक खर्चात मोठी बचत होऊ शकते. या प्रकल्पांमुळे बंदरे, खाण क्षेत्रे आणि औद्योगिक पट्टे यांना अधिक चांगली रेल्वे जोडणी मिळेल. परिणामी, निर्यातक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते. 'मेक इन इंडिया' आणि उत्पादन क्षेत्राच्या विस्ताराच्या दृष्टीनेही ही गुंतवणूक महत्त्वाची ठरते; मात्र या निर्णयाकडे केवळ सकारात्मक दृष्टीने पाहून चालणार नाही. खासगीकरणाबाबत अनेक चिंता आणि प्रश्नही उपस्थित होतात. रेल्वे हा सार्वजनिक सेवाक्षेत्राचा भाग आहे. त्यामुळे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढल्यास भविष्यात मालवाहतूक दर वाढतील का, नफ्यावर जास्त भर दिला जाईल का, याबाबत प्रश्न उपस्थित होतात. याशिवाय 'पीपीपी' मॉडेल भारतात अनेक क्षेत्रांमध्ये मिश्र परिणाम देणारे ठरले आहे. काही प्रकल्प यशस्वी झाले, तर अनेक प्रकल्प आर्थिक अडचणीत अडकले. त्यामुळे रेल्वे क्षेत्रातही पारदर्शक करार, स्पष्ट जबाबदाऱ्या आणि प्रभावी नियमन आवश्यक असेल. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे पर्यावरणीय परिणाम. कोळसा वाहतुकीसाठी स्वतंत्र कॉरिडॉर उभारणे आर्थिकदृष्ट्या आवश्यक असले, तरी भारताने हरित ऊर्जेकडे वाटचाल करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यामुळे भविष्यात कोळशावरील अवलंबित्व कमी झाले तर अशा प्रकल्पांचे दीर्घकालीन आर्थिक गणित बदलू शकते,

व्यापक पातळीवर पाहता भारतीय रेल्वे आता मोठ्या संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीला प्राधान्य देत देशात जागतिक दर्जाची लॉजिस्टिक्स व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्प, बुलेट ट्रेन, स्टेशन पुनर्विकास आणि आता खासगी सहभागातून उभारले जाणारे नवे कॉरिडॉर या सर्व प्रकल्पांमधून रेल्वेचे स्वरूप बदलताना दिसत आहे. आर्थिक वाढ टिकवून ठेवायची असेल, तर मजबूत आणि आधुनिक वाहतूक व्यवस्था अपरिहार्य आहे. रेल्वे हा त्यातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याचा निर्णय गरजेचा मानला जाऊ शकतो; पण त्याच वेळी सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि दीर्घकालीन राष्ट्रीय गरजा यांचा समतोल राखणेही आवश्यक राहणार आहे. रेल्वेच्या या नव्या मॉडेलचे यश केवळ गुंतवणूक किती आली यावर मोजले जाणार नाही, तर या प्रकल्पांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला, उद्योगांना आणि सामान्य नागरिकांना दीर्घकालीन किती फायदा झाला यावरच खरे मूल्यांकन होईल. भारतीय अर्थव्यवस्था सध्या जागतिक पटलावर वेगाने विस्तारत आहे. या विस्ताराचा कणा म्हणजे लॉजिस्टिक किंवा मालवाहतूक क्षेत्र. भारताला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर कार्यक्षम आणि स्वस्त मालवाहतूक व्यवस्था असणे अनिवार्य आहे. याच पार्श्वभूमीवर, भारतीय रेल्वेने आपल्या मालवाहतूक क्षेत्रात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी घेतलेला पुढाकार हा केवळ धोरणात्मक बदल नसून एक क्रांतिकारी टप्पा ठरणार आहे. आज भारताच्या एकूण मालवाहतुकीमध्ये रस्ते वाहतुकीचा वाटा साठ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, तर रेल्वेचा वाटा २७ ते २८ टक्क्यांच्या आसपास स्थिरावला आहे. विकसित देशांमध्ये हे प्रमाण उलट असते. रेल्वे मालवाहतूक ही रस्ते वाहतुकीपेक्षा पर्यावरणापूरक आणि मोठ्या प्रमाणात मालाची ने-आण करण्यासाठी स्वस्त असते, तरीही पायाभूत सुविधांचा अभाव, मालाच्या चढ-उतारासाठी लागणारा वेळ आणि लवचिकतेचा अभाव यामुळे रेल्वे मागे पडत होती. सरकारी तिजोरीवर असलेला ताण आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब या मर्यादा ओळखून केंद्र सरकारने 'पीएम गतिशक्ती' आणि 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी'अंतर्गत खासगी सहभागाला लाल गालिचा अंथरला आहे. रेल्वेने खासगी क्षेत्राला आकर्षित करण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या आहेत. 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर'मुळे मालवाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका तयार केल्या जात आहेत.

यामुळे मालवाहू गाड्यांचा वेग वाढणार असून खासगी कंपन्यांना स्वतःचे टर्मिनल विकसित करण्याची संधी मिळत आहे. 'गतिशक्ती कार्गो टर्मिनल्स' धोरणांतर्गत खासगी संस्थांना रेल्वेच्या किंवा स्वतःच्या जमिनीवर कार्गो टर्मिनल उभारण्याची परवानगी दिली जात आहे. यामुळे मालाची हाताळणी अधिक वेगाने आणि आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे करणे शक्य होईल. तसेच 'लिबरलाइज्ड वॅगन इन्व्हेस्टमेंट स्कीम'सारख्या योजनांमुळे उद्योजक विशिष्ट प्रकारच्या वॅगन्स खरेदी करू शकतात आणि रेल्वे नेटवर्कचा वापर करू शकतात. खासगी गुंतवणूक केवळ पैसा आणत नाही, तर कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानदेखील आणते, हे यातून दिसू शकते.

चर्चा आजची

# कृषीप्रधान देशातच शेतकरी उपेक्षित!

राकेश लोहार

भारताला जगात 'कृषीप्रधान देश' म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्याला 'अन्नदाता' म्हटले जाते. पण, आज हाच अन्नदाता स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडताना दिसत आहे. एका बाजूला शेतकरी दिवस-रात्र शेतात राबतो, घाम गाळतो, निसर्गाशी झुंज देतो; तर दुसऱ्या बाजूला त्याच्या कष्टाला ना योग्य भाव मिळतो, ना शासनाकडून अपेक्षित आधार. ही परिस्थिती केवळ दुर्दैवी नाही, तर देशाच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे.

आज हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका जर कोणाला बसत असेल, तर तो शेतकऱ्याला. कधी दुष्काळ, कधी अवकाळी पाऊस, कधी गारपीट, तर कधी अतिवृष्टी फटका. निसर्गाचे हे बदलते रूप शेतकऱ्याच्या आयुष्याशी खेळ करत आहे. शेतकरी आशेने पिक उभे करतो, लाखो रुपये खर्च करतो; पण एका रात्रीच्या अवकाळी पावसात संपूर्ण पीक मातीमोल होते. त्याच्या डोळ्यांसमोर त्याचे स्वप्न वाहून जाते. त्यानंतर उरते ती फक्त कर्जाची नोटीस आणि नैराश्य.

आज शेती करणे म्हणजे जुगार खेळण्यासारखी परिस्थिती झाली आहे. शेतकरी बियाणे टाकताना आशेचे स्वप्न पाहतो; पण बाजारपेठ, हवामान आणि सरकारी धोरणे या तिन्ही गोष्टी त्याच्या विरोधात उभ्या ठाकतात. खतांचे दर वाढले, बियाण्यांचे दर वाढले, औषधांचा खर्च वाढला, मजुरी वाढली; पण शेतमालाचा दर मात्र तसाच आहे. उत्पादन खर्च वाढत चालला आहे आणि उत्पन्न कमी होत चालले आहे. त्यामुळे शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकत चालला आहे.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था तर अधिकच बिकट झाली आहे. कांद्याला योग्य भाव मिळत नाही. उत्पादन खर्च वाढत चालला आहे; पण बाजारात मिळणारा दर मात्र कवडीमोल. अनेक वेळा शेतकरी कांदा रस्त्यावर फेकून देताना दिसतो. कारण, विक्रीतून वाहतूक खर्चही निघत नाही. हा देशासाठी लाजिरवाणा प्रकार नाही का? ज्या शेतकऱ्यामुळे देशाच्या ताटात अन्न येते, त्यालाच आपल्या मालाची किंमत मिळत नाही, ही कोणती अर्थव्यवस्था?

फक्त कांदाच नाही, तर टोमॅटो, सोयाबीन, कापूस, ऊस, द्राक्षे अशा अनेक पिकांबाबतही शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. कधी उत्पादन जास्त झाले म्हणून भाव पडतात, तर कधी आयात-निर्यातीच्या चुकीच्या धोरणांचा फटका शेतकऱ्याला बसतो. बाजारात दलाल आणि व्यापाऱ्यांचे जाळे इतके मजबूत झाले आहे की, शेवटी तोट्यात फक्त शेतकरीच राहतो. शहरातील लोकांना भाजीपाला महाग मिळतो, पण तोच माल उत्पादक शेतकरी मात्र कवडीमोल दरात विकायला मजबूर होतो. ही व्यवस्थेची शोकांतिका नाही तर काय?

याहून गंभीर बाब म्हणजे, सरकारची भूमिका. शेतकरी रडतोय, आंदोलन करतोय, रस्त्यावर उतरतोय; पण सत्ताधाऱ्यांच्या कानावर जणू काहीच पडत नाही. सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत मुके, आंधळे आणि बहिरे झाले आहे, अशी भावना जनतेमध्ये निर्माण झाली आहे. निवडणुकांच्या काळात शेतकऱ्यांचे प्रश्न मोठ्या आवाजात मांडले जातात; पण सत्ता मिळाल्यानंतर त्याच प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते.

आज देशाचा शेतकरी हमीभावासाठी रस्त्यावर उतरला आहे. कर्जमाफीसाठी आंदोलन करत आहे. पीक विम्याच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीविरोधात आवाज उठवत आहे. पण, त्याला मिळते ती केवळ आश्वासने. अनेक वेळा पंचनामे होतात; पण मदत मिळत नाही. मदत जाहीर होते; पण ती शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचत नाही. पीकविमा कंपन्या कोट्यवधींचा नफा कमावतात आणि नुकसान झालेला शेतकरी मात्र सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवत राहतो.

आज परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, शेतकरी आपल्या मुलांना शेतीकडे वळू देण्यास घाबरत आहे. ''शेतीत भविष्य नाही'' ही भावना ग्रामीण भागात वाढत चालली आहे. अनेक तरुण गाव सोडून शहरांकडे धावत आहेत. कारण, त्यांच्या डोळ्यासमोर त्यांनी आपल्या वडिलांची आयुष्यभराची झुंज पाहिली आहे. कर्ज, नुकसान, अपमान आणि असुरक्षितता याशिवाय शेतीत काही उरलेले नाही, अशी त्यांची भावना झाली आहे.

जर देशातील तरुण शेतीपासून दूर जाऊ लागले, तर भविष्यात अन्नसुरक्षेचे मोठे संकट उभे राहू शकते. शेतकरी आंदोलन करत असताना त्यांच्यावर लाठीमार केला जातो, त्यांना अडवले जाते, त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जाते. ज्यांच्या हातात नांगर आहे, ज्यांच्या कष्टामुळे देशाचे पोट भरते, त्यांच्याशीच अशी वागणूक दिली जाते. ही लोकशाहीची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

देशाची खरी प्रगती ही शेतकऱ्याच्या प्रगतीत असते. शेतकरी सुखी असेल तर देश सुखी राहतो. पण, आज परिस्थिती उलटी आहे. शेतकऱ्याच्या घामाची किंमत नाही, कष्टाची कदर नाही, आणि संकटात आधारही नाही. जर अशीच परिस्थिती राहिली, तर 'कृषीप्रधान देश' ही ओळख फक्त भाषणांपुरती उरेल. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाला पाहिजे. शेतमाल साठवणूक, प्रक्रिया उद्योग, थेट बाजारपेठ आणि निर्यातीसाठी मजबूत व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. अन्यथा शेतकरी अधिकाधिक संकटात जाईल आणि देशाची कृषीव्यवस्था कोलमडण्याची भीती निर्माण होईल.

कारण, ज्या दिवशी शेतकऱ्याच्या हातातील नांगर थांबेल, त्या दिवशी देशाच्या विकासाची चाकेही थांबतील. मग ना मोठमोठी भाषणे उपयोगाची ठरतील, ना परदेशातील टाळ्या. उरेल ती फक्त उपाशी पोटांची वेदना आणि एका अन्नदात्याच्या दुर्लक्षित अश्रूंची कहाणी. अन्यथा उद्याचा इतिहास असा लिहिला जाईल की, ''ज्या देशाने शेतकऱ्याला देव मानले, त्याच देशाने त्याला सर्वाधिक उपेक्षित ठेवले.''

लोकसंसद

## पर्यावरणप्रेमाचे धडे फक्त एका समाजालाच ?

देशासह राज्यात उद्योगधंद्यांना जशी चालना मिळत गेली तशी प्रदूषणामध्येही वाढ होत गेली. कारखान्यांमधील दूषित आणि रासायनिक द्रव नद्यांमध्ये वर्षभर सोडल्याने होणाऱ्या जलप्रदूषणाच्या तुलनेत गणेशमूर्ती विसर्जनाने होणारे प्रदूषण नगण्य असतानाही तथाकथीत पर्यावरणप्रेमी आणि स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी नैसर्गिक प्रवाहांत गणेशमूर्ती विसर्जनाला विरोध करतात. हिंदू समाजाने पर्यावरणाला नेहमीच आदरस्थानी मानल्याने घरी मातीची गणेशमूर्ती बसवणाऱ्यांचे प्रमाण आज कमालीचे वाढले आहे. दिवाळी जवळ आली की पर्यावरणप्रेमी फटाके न फोडण्याचे आवाहन करतात. हिंदूंनी याचेही स्वागत करून गेल्या काही वर्षांत मोठ्या आवाजांपेक्षा शोभेच्या फटाक्यांना अधिक पसंती दिली आहे. होळीला केवळ सुकी लाकडे जाळली जातात तर रंगपंचमीच्या दिवशीही पाण्याचा कमीतकमी वापर करून सुक्या रंगाने होळी साजरी करण्याचा प्रयत्न करतात. एकूणच पर्यावरणप्रेमींच्या प्रत्येक सूचनांचे हिंदूंनी स्वागतच केले आहे. मात्र हेच पर्यावरणप्रेमी बकरी ईदच्या दिवशी लाखो जनावरांची कत्तल केली जाते, सांडलेले रक्त धुऊन काढण्यासाठी कोट्यवधी लिटर पाणी वापरले जाते तेव्हा कुठे असतात? पर्यावरणप्रेमाचे धडे यांना का दिले जात नाहीत? यंदाच्या प्रचंड उकाड्यामुळे राज्याच्या अनेक भागात विहिरींतील, नद्यांतील पाणी आटले आहे, परिणामी पाण्याच्या एका हंड्यासाठी नागरिकांना वणवण फिरताना पाहिले. कितीतरी मुके प्राणी आणि पक्षी पाण्याविना तडफडून मेले. यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुंबई-ठाणे सारख्या शहरांत कधी नव्हेती पाणी कपात करण्यात आली आहे. राज्याच्या अनेक भागात यावेळी दुष्काळी परिस्थिती ओढवण्याची दाट शक्यता आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर**

दिनविशेष

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होतं. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२७ मे**

१)श्री.सीताराम सदानंद वेंगुर्लेकर मु.वाडगाव, अलिबाग २७-०५-१९४१

२) श्रीम.प्रभावती परशुराम ठाकूर मु.पेझारी, अलिबाग, २७-०५-१९४२

३)मेघजी पालन देडिया पिंपळभाट, अलिबाग २७-०५-१९४७

४)श्री गिरीशभाई ईश्वरभाई पटेल मेयकारवाडी समोर, अलिबाग २७-०५-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



**अरहा राहुल पाटील, वाढदिवस अलिबाग**

# महावितरणचा ढिसाळ कारभार

## ● खांदा वसाहतीत वारंवार वीजपुरवठा खंडित; उकाड्याने रात्रभर नागरिकांचे हाल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खांदा वसाहत सेक्टर-८ परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून महावितरणच्या ढिसाळ कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रविवारी मध्यरात्री एकच्या सुमारास भूमिगत वीज केबलमधून अचानक धूर येऊ लागल्याने सुरक्षेच्या कारणास्तव वीज प्रवाह तातडीने बंद करण्यात आला. मात्र त्यानंतर अनेक तास वीजपुरवठा सुरळीत न झाल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्यात रात्र काढावी लागली.

घटनेनंतर नागरिकांनी तातडीने वीज वितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र अनेक फोन सतत एन्गेज लागत होते, तर काही अधिकाऱ्यांकडून ''मेसेज करा'' अशी उत्तरे मिळत होती. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. ''वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर नागरिकांनी नेमके कोणाशी संपर्क साधायचा?'' असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.



दरम्यान, वीज वितरण कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पाहणी करत दुसऱ्या केबलवरून वीजपुरवठा सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही वेळ वीज सुरूही झाली, मात्र अवघ्या अर्ध्या तासात पुन्हा दुसऱ्या केबलमध्ये बिघाड झाल्याने संपूर्ण परिसर पुन्हा अंधारात गेला. वाढत्या उष्म्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांचे मोठे हाल झाले. अनेक नागरिक घराबाहेर रस्त्यावर येऊन बसल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळाले.

नागरिकांनी पनवेल, भिंगारी तसेच भांडुप येथील वीज वितरण कार्यालयांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणत्याही अधिकाऱ्याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. 'आम्ही नियमित वीज बिल भरतो, मग चोवीस तास अखंड वीजपुरवठा देणे ही महावितरणची जबाबदारी नाही का?' असा संतप्त प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

महावितरणने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करून खांदा वसाहतीतील नागरिकांना अखंड वीजपुरवठा द्यावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### आपत्कालीन सेवेसाठी केवळ दोन कर्मचारी

सध्या खांदा वसाहत परिसरात मोठ्या प्रमाणावर रीडेव्हलपमेंटची कामे सुरू असून नव्या इमारतींना वीजपुरवठा देण्यासाठी भूमिगत केबलचे काम सुरू आहे. या कामांचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या वीजपुरवठ्यावर होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. विशेष म्हणजे संपूर्ण खांदा वसाहतीतील रात्रीच्या आपत्कालीन सेवेसाठी केवळ दोन कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती समोर येत आहे.

# धावत्या ट्रेनची होणार स्वयंचलित तपासणी

## ● 'पॅन्टोग्राफ स्थिती निरीक्षण प्रणाली' मुंबई मेट्रोमध्ये कार्यान्वित

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

तंत्रज्ञानाधारित शहरी वाहतूक व्यवस्थेमध्ये आपले अग्रस्थान अधिक मजबूत करत एमएमआरडीएने भारतातील पहिली स्वयंचलित 'पॅन्टोग्राफ स्थिती निरीक्षण प्रणाली' महा मुंबई मेट्रोमध्ये कार्यान्वित केली आहे. मेट्रो संचालनातील पूर्वानुमानाधारित देखभाल, स्मार्ट निरीक्षण आणि तांत्रिक सुरक्षिततेच्या दृष्टीने ही प्रणाली अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.



नव्या 'एआय'आधारित प्रणालीमुळे प्रत्येक धावत्या ट्रेनच्या पॅन्टोग्राफची रिअल-टाइममध्ये ऑपरेशनल वेगातच स्वयंचलित तपासणी होणार आहे. त्यामुळे कार्बन स्ट्रिपची असमान झीज, तडे, संरचनात्मक त्रुटी यांसारखे किरकोळ दोष वेळेत निदर्शनास येणार आहेत. तसेच, 'एआय'आधारित रिअल-टाइम मॉनिटरिंगमुळे पॅन्टोग्राफ तपासणीचा कालावधी ३० मिनिटांवरून काही सेकंदांपर्यंत कमी होणार आहे. तसेच देखभाल कार्यक्षमतेत ९० ते ९५ टक्क्यांनी वाढ होणार आहे. पूर्वी पॅन्टोग्राफ तपासणी नियोजित देखभाल चक्रांदरम्यान मॅन्युअली केली जात होती. यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आणि वेळ लागत असे. तसेच तपासणी केवळ ठराविक कालावधीनंतर होत असल्याने सतत निरीक्षण शक्य नव्हते. मात्र नव्याने कार्यान्वित करण्यात आलेली प्रणाली ही प्रक्रिया पूर्णपणे बदलत असून, प्रत्येक धावत्या ट्रेनच्या पॅन्टोग्राफची रिअल-टाइममध्ये, कोणताही व्यत्यय न आणता आणि ऑपरेशनल वेगातच स्वयंचलित तपासणी करते.



# नवीन पनवेलमध्ये पुन्हा रस्ते खोदले

## ● पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण होणार का? ● नागरिकांचा सवाल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल परिसरात अवघ्या काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या रस्त्यांच्या डांबरीकरणानंतर आता पुन्हा मोठ्या प्रमाणावर रस्ते खोदकाम सुरू करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सेक्टर १२, १३, १५, १७ आणि १८ या भागांमध्ये महानगर गॅस पाइपलाइन, सीसीटीव्ही यंत्रणा आणि पाणीपुरवठा वाहिन्यांसाठी विविध ठिकाणी रस्ते खोदले जात आहेत. विशेष म्हणजे अवघ्या चार महिन्यांपूर्वीच या रस्त्यांवर डांबरीकरण करण्यात आले होते. नव्याने तयार केलेले रस्ते पुन्हा खोदण्यात येत असल्याने महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारावर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या खोदकामांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडले असून धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी वाढत असून अपघातांचा धोका देखील निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, खोदकामानंतर अनेक ठिकाणी रस्ते तात्पुरत्या स्वरूपात बुजवले जात आहेत. मात्र, पावसाळ्यात हेच रस्ते चिखलमय होण्याची शक्यता असून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घाईगडबडीत सुरू असलेल्या कामांच्या गुणवत्तेबाबतही शंका उपस्थित केल्या जात आहेत.

'पावसाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस उरले असताना प्रशासन ही कामे नेमकी कधी पूर्ण करणार?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## राजाराम खाडे यांचे निधन

**पाली :** सुधागड तालुक्यातील रासळ येथील समाजसेवक राजाराम रामचंद्र खाडे यांचे गुरुवारी (दि.१४) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने खाडे कुटुंबासह संपूर्ण रासळ गावकऱ्यांवर आणि परिसरात शोककळा



पसरली आहे. एका सुसंस्कृत आणि ज्येष्ठ मार्गदर्शकाला आपण मुकलो, अशी भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी स्नेहलता खाडे, दोन मुले रविंद्र खाडे व नरेश खाडे, सुना रसिका खाडे व सुवर्णा खाडे, नातू अथर्व, तसेच जान्हवी, तन्वी, वैष्णवी आणि याज्ञिका अशा चार नाती असा मोठा आणि परिवार आहे.

## बजरंग दलाची हिंदू जनजागृती सभा

**रसायनी :** अखिल आर्यावर्त संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली श्री महाकाल फार्म हाऊस, जु-नांदखी कांबे रोड येथे भव्य हिंदू जनजागृती सभा पार पडली. यावेळी शेकडो हिंदू बांधवांच्या उपस्थितीत दिनेश पाटील यांनी विविध विषयांवर परखड भाषण केले. हिंदूंनी वेळीच जागे होण्याची गरज असल्याचे सांगत लव जिहादच्या वाढत्या घटनांवर दिनेश पाटील यांनी संताप व्यक्त केला. तसेच, आपल्या मुलींना वाचवण्यासाठी प्रत्येक हिंदू घराने सतर्क राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. श्री मलंग गड हा मच्छिंद्रनाथांचा आहे. त्याच्या मुक्तीसाठी हिंदूंना सक्रिय व्हावे लागेल. सरकार हिंदुत्ववादी आहे मग बकरी ईदच्या दिवशी दुर्गाडी किल्ल्यावर आरतीसाठी हिंदूंना आंदोलन का करावे लागते? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. तर कोकण प्रांत अध्यक्ष प्रसिध्दी विभागाचे राकेश खराडे यांनी हिंदूंनी जागे होण्याची वेळ आल्याचे सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक विशाल पाटील यांची ठाणे जिल्हा महामंत्री व पालघर जिल्हा पालकपदी नियुक्ती करण्यात आली.

## रोहामधील रोठ खुर्द ग्रामपंचायत अव्वल

**खांब :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये रोहा तालुक्यातील रोठ खुर्द ग्रामपंचायतीने अव्वल स्थान पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्राम पंचायतीने स्वच्छता, विकासकामे, लोकसहभाग, पारदर्शक प्रशासन, पाणीपुरवठा, महिला सक्षमीकरण तसेच विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत हा बहुमान मिळविला. रोठ खुर्द ग्रामपंचायतीच्या या यशाबद्दल विविध स्तरातून कौतुक होत असून इतर ग्रामपंचायतींसाठी हा आदर्श ठरत आहे.



## सानवी खांडेकरला 'महाराष्ट्ररत्न' पुरस्कार

**नागोठणे :** मार्शल आर्टस् स्पोर्टस् एकॅडमी रायगड यांच्या वतीने महाराष्ट्र रत्न पुरस्कार सोहळा पेण येथे नुकताच पार पडला. यामध्ये महाराष्ट्रातील क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, अध्यात्मिक, वैद्यकीय, उद्योजक अशा अनेक क्षेत्रातील मान्यवरांना महाराष्ट्र रत्न या पुरस्काराने गौरविण्यात आले. याच कार्यक्रमात नागोठण्याजवळील पाले (पो.मेढा) येथील सानवी संदीप खांडेकर हिला क्रीडा क्षेत्रातील कराटे प्रकारात दिलेल्या भरीव योगदानाबद्दल 'महाराष्ट्र रत्न' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सानवी खांडेकर रोहा येथे शिक्षण घेत असून तिने जिल्हा व राज्य स्तरावरील विविध कराटे स्पर्धेत सहभागी होऊन अनेक पदके मिळविली आहेत. तिच्या या कार्याची दखल घेऊनच कुमारी सानवी खांडेकर हिला 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन सोहळा

**तळा :** तळा शहरातील कासार अळी बाजारपेठ येथे श्री स्वामी समर्थ मठाचा तृतीय वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कासार आळी येथे असलेल्या स्वामी समर्थ मठात असलेल्या स्वामींच्या मूर्तीला आंब्यांची आकर्षक आरस करण्यात आली होती. यानिमित्ताने सोमवारी (दि.२५) पहाटे काकड आरती, साडेआठ वाजता गणेश पूजन पुण्यवाचन व षोडशोपचार पूजा, साडेनऊ वाजता मूर्तीवर अभिषेक, साडेदहा वाजता होम हवन, दुपारी एक वाजता आरती व महाप्रसाद, सायंकाळी चार वाजता पारायण, साडेपाच वाजता भजन असे कार्यक्रम पार पडले.

# अपघातग्रस्त चालकाला जीवदान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर वाहतूक शाखा यांच्या तत्परतेमुळे आसूडगाव येथे झालेल्या भीषण अपघातात एका वाहन चालकाचे प्राण वाचल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे खाकी वर्दीतील माणुसकीचे पुन्हा एकदा दर्शन घडले असून नागरिकांकडून वाहतूक पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आसूडगाव येथील इंडियन ऑईल पंपाजवळ एका वाहनाचा गंभीर अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, वाहन चालकाचा पाय वाहनामध्ये अडकून पडला होता. त्यामुळे चालकाची अवस्था अत्यंत गंभीर बनली होती. याच दरम्यान औदुंबर पाटील हे आपल्या



## ● पनवेल वाहतूक पोलिसांची तत्परता

पथकासह परिसरात गस्त घालत होते. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी कोणताही विलंब न करता तात्काळ घटनास्थळी धाव घेत आपल्या सहकाऱ्यांसह प्रसंगावधान राखत मदतकार्य सुरू केले. अपघातग्रस्त चालकाचा पाय वाहनात अडकलेला असल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर होती. मात्र, पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करत चालकाला सुखरूप बाहेर काढले.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी स्वतः मदतकार्यात सक्रिय सहभाग घेतल्याने जखमी चालकाचे प्राण वाचले. त्यानंतर संबंधित चालकाला पुढील उपचार व कार्यवाहीसाठी कळंबोली वाहतूक शाखा यांच्या ताब्यात देण्यात आले. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या तत्पर कामगिरीमुळे नागरिकांकडून पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**कर्जत तालुक्यातील पाण्याची स्थिती बिकट | २१ गाव-वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा**

# टँकरच्या मागणीमध्ये वाढ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात प्रचंड उष्म्याने आदिवासी आणि ग्रामीण भागातील पाण्याचे स्तोत्र यांनी तळ गाठला आहे. त्यामुळे आजच्या घडीला तालुक्यात २१ गावे आणि वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. दरम्यान पाण्याची टंचाई वाढत असून टँकरची मागणी वाढत असल्याची माहिती कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी दिली असून १२ टँकरचा वापर सध्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी केला जात आहे.



कर्जत तालुक्यात दरवर्षी मार्च महिना सुरू झाला की पाणीटंचाई जाणवू लागते. तालुक्यातून टाटा धरणाच्या पाण्यावर पेज नदी उल्हास नदीला मिळेपर्यंत बारमाही वाहते. मात्र त्याआधी उल्हास नदी कोरडे असते. तसेच तालुक्यातून वाहणाऱ्या चिल्हार, पोश्री या मोठया नद्या उन्हाळ्यात कोरड्या असतात. त्याचवेळी अनेक उपनद्या या उन्हाळ्यात कोरड्या असल्याने तालुक्यात पाणीटंचाईचे दुर्भिक्ष्य उन्हाळा सुरू झाला की अधिक प्रमाणात जाणवते. त्यात जलजीवन मिशन योजनेचे अनेक नळपाणी योजना निधीअभावी रखडल्या आहेत. हे लक्षात घेऊन पाणीटंचाई आराखडा डिसेंबर २०२५ मध्ये तयार करण्यात आला आहे. यावर्षी कर्जत तालुक्यातील २० गावे आणि ३९ आदिवासी वाड्या या पाणीटंचाई ग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत. या सर्व पाणीटंचाईग्रस्त भागातील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी शासनाने टँकरचे माध्यमातून पाणीपुरवठा सुरू करण्याचे पाणीटंचाई कृती आराखड्यात नमूद केले होते. यावर्षी पहिला शासकीय टँकर अशाणे गावातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सुरू झाला आहे. शासनाने जिल्हाधिकारी स्तरावर टँकर निविदा मागवली होती, त्यानुसार कर्जत तालुक्यासाठी १२ टँकर मंजूर झाले आहेत. या टँकरमधून पाणी टंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जाणार आहे.

### 'या' गावांचा समावेश

कर्जत तालुक्यातील आशाणे, कोषाने, पळसदरी, पाथरज, मोगरज, खानंद, धामणी या गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. तर किरवली ठाकूरवाडी, सावरवाडी ठाकूरवाडी, पळसदरी ठाकूरवाडी, वर्णे ठाकूरवाडी, चिमटे वाडी, जांभूळ वाडी, झुगरेवाडी, किरवली, पेटारवाडी, लोभेवाडी, पिंगळस, फणसवाडी, भक्तची वाडी, सराईवाडी, पाच खडकवाडी, मोहपाडा, मेचकरवाडी, धोत्रेवाडी आणि बणाचीवाडी या १३ वाड्यामध्ये शासकीय टँकरमधून पाणीपुरवठा केला जात आहे.

# निवडक



## चौपाट्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेत वाढ

**मुंबई :** पावसाळ्यात समुद्रकिनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटक आणि मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने लाईफ गार्डची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यंदाच्या पावसाळ्यात ९३ लाइफ गार्डऐवजी १३७ लाइफ गार्डची नियुक्ती करण्यात येणार आहे, अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा यांनी दिली. मुंबईत एकूण १२ चौपाट्या असल्या तरी गिरगाव, दादर, वर्सोवा, जुहू, अक्सा आणि गोराई अशा मोठ्या चौपाट्या आहेत. या ठिकाणी पावसाळ्यात मुंबईकरांची मोठी गर्दी होते. मात्र यावेळी समुद्राला उधाण असल्यास समुद्रात जाणे धोकादायक ठरते. मात्र काही अतिउत्साही पर्यटक समुद्रात जात असल्याने जीवितहानी होण्याचे प्रकारही घडतात. त्यामुळे चौपाट्यावर घडणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी पालिकेने सुरक्षेसाठी लाइफ गार्डची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या केवळ ९३ सुरक्षारक्षक कार्यरत असून आता १३७ लाइफ गार्ड चौपाट्यावर तैनात राहणार आहेत. तर प्रत्येक लाईफ गार्ड ३ ते ४ किलोमीटरपर्यंतच्या समुद्री परिसरावर नजर ठेवणार असल्याचे अतिरिक्त आयुक्तांनी सांगितले.

## विठ्ठल रखुमाई मंदिराचा वर्धापन दिन

**म्हसळा :** म्हसळा शहरात प्रतिपंढरपुर असलेल्या गवळवाडी येथे बाळमित्र ग्रामस्थ, मुंबई मंडळ, शिवांजली क्रिकेट संघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचा २४ वा वर्धापनदिन सोहळा उत्साही व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्याने अभिषेक सोहळा, पालखी मिरवणूक, श्री सत्यनारायणाची महापुजा, महाआरती, कीर्तन, महाप्रसाद, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी गुणगौरव आणि जीपीएल क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्थानिक आणि मुंबई निवासी ग्रामस्थ मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अथक मेहनत घेतली. कला आणि क्रीडा क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थी वर्गाला शिष्यवृत्ती रोख बक्षीस आणि शैक्षणिक साहित्य भेट देऊन सन्मानित करण्यात आले. वर्धापदिनानिमित्त गावातील बहुतांश सदस्यांनी मोठया प्रमाणात देणगी देऊन तसेच सदस्य परेश खताते यांनी अन्नदान केले. शेकडो भाविक भक्तगणांनी देवदर्शनाचा लाभ घेतला. आयोजित कार्यक्रमात भाविक भक्त, गवळवाडी ग्रामस्थ महिला मंडळ, विद्यार्थी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.





## 'गोहत्या बंदी कायद्याचे पालन करावे'

**रसायनी :** ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त रसायनी पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि.२६) उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या उपस्थितीत रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील आपटा व वावेघर मुस्लिम समाजाचे प्रमुख तसेच अखिल आर्यंवत संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दल यांच्यात बैठक झाली. या बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी मार्गदर्शन केले. गोहत्या बंदी कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. बकरी ईद, हा 'कुर्बानी' म्हणजेच त्याग, समर्पण आणि परोपकार यांचा संदेश देणारा पवित्र सण आहे. इस्लाम धर्मातील परंपरेनुसार, पैगंबर इब्राहिम यांनी अल्लाहच्या आदेशाप्रती निष्ठा आणि समर्पण दर्शवित आपल्या प्रिय गोष्टीचा त्याग करण्याची तयारी दाखवली. त्याच स्मरणार्थ 'कुर्बानी'ची परंपरा आजही पाळली जाते. परंतु, महाराष्ट्रात गोहत्या बंदीचा कायदा लागू आहे. गाईला राज्यमाता हा दर्जा देण्यात आला आहे. तरी गाय, बैल, वासरु यांची कत्तल झाल्याचे समजल्यास पोलिस प्रशासनाकडून कडक कारवाई होईल, असे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांनी सांगितले. यावेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने प्रसिध्दी विभागाचे कोकण प्रांत अध्यक्ष राकेश खराडे यांनी सांगितले की, बजरंग दलाचे कार्यकर्ते राज्यासह कोकण विभागात संरक्षणासाठी विविध भागांमध्ये सतर्क राहणार आहेत. यावेळी गोसंरक्षक मलेश गुडसे यांनी आगामी बकरी ईद सणादरम्यान गोहत्या करु नये, असे सांगितले. तसेच ॲड. प्रमोद मैदर्गीकर यांनी मुस्लिम समाजाने कायद्याचे पालन करावे, असे सांगितले.

## इंधन दरवाढ तात्काळ मागे घ्या

### खा. वर्षा गायकवाड यांची मागणी

**मुंबई :** महागाईने जनता त्रस्त असताना पेट्रोल डिझेलची दरवाढ ही सर्वसामान्य जनतेला आणखी महागाईच्या खाईत लोटण्याचा प्रकार आहे. मागील ११ दिवसात पेट्रोल डिझेलचे दर प्रति लिटर ८ रुपयांनी वाढले आहेत. ही इंधन दरवाढ सर्वसामान्यांचा खिसा रिकामा करणारी असून केंद्रातील भाजपा सरकारने ही अन्यायकारक दरवाढ तात्काळ मागे घेऊन जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार प्रा. वर्षा गायकवाड यांनी केली आहे. इंधन दरवाढीवर बोलताना खा. वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी हे पेट्रोल डिझेलचा आवश्यक तेवढा साठा देशात आहे हे सांगत होते. परंतु विधानसभा निवडणुका होताच पेट्रोल डिझेलची दरवाढ सुरु केली आहे. मागील महिन्यातच एलपीजी सिलेंडरच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढवल्या. व्यावसायिक सिलेंडरच्या किमती तर दुप्पट केल्याने हॉटेलसह खाद्य पदार्थ बनवणारे छोटे व्यवसाय संकटात आले व खाद्य पदार्थांचे दरही वाढले. आता पेट्रोल डिझेलचे दर वाढत आहेत, त्यामुळे महागाई आणखी वाढेल. युपीए सरकारच्या काळात डॉ. मनमोहनसिंह यांनी सबसीडी देऊन जनतेला दिलासा दिला आणि महागाईची झळ बसू दिली नाही, पण मोदी सरकार मात्र जनतेला कोणत्याच प्रकारे दिलासा देत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महागाई, बेरोजगारी, यासह जनतेच्या प्रश्नात काहीच स्वारस्य नाही. जनता पिचलेली असताना पंतप्रधान मात्र विदेशी दौरे करत चॉकलेट वाटत फिरत आहेत, असेही त्या म्हणाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही पेट्रोलचा पर्याप्त साठा आहे हे सांगत आहेत, पण राज्यातील काही भागात पेट्रोल पंप बंद आहेत. खोटी माहिती देऊन जनतेची दिशाभूल करण्यापेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी पेट्रोल डिझेलची टंचाई होणार नाही व महागाईची झळ जनतेला पोहचणार नाही, याकडे लक्ष द्यावे, असेही खा. वर्षा गायकवाड म्हणाल्या.

## निवडक

### गुरुवारी होणार बकरी ईद साजरी

**माणगाव :** ईद-उल-झुआ म्हणजेच बकरी ईद गुरुवारी (दि.२८) मे २०२६ रोजी सर्वत्र साजरी केली जाणार आहे. या ईदची जोरदार तयारी मुस्लिम बांधवांकडून करण्यात आली आहे. रमजान ईदनंतर दोन महिन्यांनी बकरी ईद येते. या बकरी ईदला अल्लाहच्या नावाने बोकडांवर दिल्या जाणाऱ्या कुर्बानीमुळे विशेष असे महत्व आहे. रमजान ईदप्रमाणेच बकरी ईद अत्यंत उत्साहात मुस्लिम बांधव साजरी करीत असतात. माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत बकरी ईदची नमाज सकाळी ८ वाजता होणार असल्याचे या मोहल्ल्याचे अध्यक्ष सिद्दिक परदेशी यांनी सांगितले आहे.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**महाड :** प्रभात कॉलनी मित्र मंडळ, महाड यांच्यावतीने इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या प्रभात कॉलनीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये सुमारे ४० विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी राजन सुर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे उपप्राचार्यसुरेंद्र वानखेडे, माजी केंद्रप्रमुख मानसी धाटावकर, गंगाधर साळवी, संकेत वारंगे, निखिल शिंदे, दीपक चव्हाण, मिनल जाधव, दिक्षा शिंदे, ॲड. सनी जाधव, संकेत वारंगे, गणेश कारंजकर, रोहित पाटील यांच्यासह प्रभात कॉलनी मित्र मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, पालक, ज्येष्ठ नागरिक, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश देवळेकर यांनी केले. तर प्रकाश धाटावकर यांनी सूत्रसंचालन करत आभार प्रदर्शन केले.

### खोपोलीत शांतता कमिटीची बैठक



**खोपोली :** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि धार्मिक सुसंवाद कायम राखण्यासाठी खोपोली पोलीस स्टेशनच्या वतीने सोमवारी (दि.२५) मे रोजी पोलीस स्टेशनच्या सभागृहात शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत 'बकरी ईद' या सणाला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी सर्व समाजघटकांनी सर्वसमावेशक भूमिका घेत सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीला रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल, पोलीस निरीक्षक सचिन हिरे, खोपोली नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, उपमुख्याधिकारी रणजीत पवार डॉ. नेत्रा असवार उपस्थित होते. यावेळी हिंदू व मुस्लिम धर्मीय सामाजिक स्तरावर कार्यरत पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी सांगितले की, बकरी ईदचा सण धार्मिक सुसंवाद आणि सामाजिक सलोखा जपत साजरा व्हावा. शहरात कोणत्याही प्रकारे तणाव निर्माण होणार नाही, यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे असे आवाहन त्यांनी केले.

### म्हसळ्यात शांतता समितीची सभा

**म्हसळा :** श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा पोलीस ठाण्यात बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती सभेचे आयोजन करण्यात आले. बकरी ईद सण उत्साहपूर्ण, आनंदी व शांततेत साजरा व्हावा तसेच नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी ही सभा घेण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी म्हसळा तालुका हा शांतताप्रिय असून येथे सर्व धर्मीय नागरिक गुण्यागोविंदाने राहत असल्याचे सांगितले. धार्मिक तेढ निर्माण करणारे अथवा सोशल मीडियावर व्हायरल होणारे आक्षेपार्ह संदेश याबाबत नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच सण-उत्सवांच्या काळात अनोळखी व्यक्तींच्या संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. उपविभागीय शांतता समिती सभेत माजी सभापती महादेव पाटील मुब्बशिर जमादार, अनिल बसवत, अनिकेत पानसरे, सुनिल शेडगे, महमद पेणकर,श्री समीर घराडे, फारुख पेणकर, सुशील यादव, बाबू शिर्के, हेमंत नाक्की, निलेश मांदाडकर, शाहीद ऊकये, कौस्तुभ करडे, सोहेब हळदे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रबोधन-मार्मिक स्पर्धेचे आयोजन

**पनवेल :** दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रबोधन गोरेगाव संस्थेचे संस्थापक सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधन गोरेगाव संस्था आणि साप्ताहिक मार्मिक यांच्यातर्फे साहित्य सेवक वसंत तावडे स्मृतीप्रित्यर्थ प्रबोधन-मार्मिक कथा स्पर्धा आयोजित करण्यात आली असून यावेळी या स्पर्धेचे स्वरूप अधिक व्यापक असणार आहे. गेली दोन वर्षे या स्पर्धेला उत्स्फूर्त महाराष्ट्रातूनच नव्हे, तर इतर राज्यांमधूनही जोरदार प्रतिसाद मिळाल्यामुळे यंदा ही स्पर्धा दोन विभागांत घेतली जाणार आहे. विनोदी कथांच्या स्पर्धेसाठी लेखकांनी ३,५०० ते ४,००० या शब्दमर्यादेतील कथा पाठवायच्या आहेत. लघुतम कथा ६०० ते ७०० या शब्दमर्यादेत बसणारी असावी. दोन्ही स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुल्या असून कोणत्याही स्पर्धकाला एकाच विभागात कथा पाठवता येईल. प्रवेश शुल्क २०० रुपये असून विभाग दोनसाठी ते १०० रुपये आहे. कथांचे अर्ज १ ते २६ जून २०२६ या काळात स्वीकारले जातील. कथा पाठवण्याची अंतिम तारीख ७ जुलै २०२६ ही आहे. कथा स्पीडपोस्टने किंवा prabhodhankridabhavan2014gmail.com या ईमेलवर पाठवता येतील. प्रत्यक्ष कार्यालयात येऊन दिलेल्या कथा स्वीकारल्या जाणार नाहीत. पोस्टाने कथा पाठवण्याचा पत्ता- मा. प्रमुख कार्यवाह, प्रबोधन गोरेगाव, प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव पश्चिम मुंबई ४००१०४. स्पर्धेसाठीचे प्रवेश अर्ज स्वतःच्या नाव सांगून ७५०६७६०६७६ या क्रमांकावरून मागवता येतील. यासाठी दुपारी तीन ते पाच या वेळेतच संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी** आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- jai santoshi maa CNG Alibag wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812
- JOB VACANCY अलिबागमध्ये कामाला कार ड्रायव्हर हवा आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जनगणनेच्या कामांनी कर्मचारी त्रस्त

■ अपुऱ्या मनुष्यबळाने प्रशासकीय कामे खोळंबली ■ विद्यार्थी आणि नागरिकांना मारावे लागताहेत हेलपाटे

**| माणगाव | प्रतिनिधी |**

राज्यात आणि देशभरात सुरू असलेल्या विविध शासकीय सर्वेक्षण, जनगणना आणि एसआरआर (सर्वेक्षण नोंदणी) प्रक्रियेमुळे अनेक शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांवर प्रचंड कामाचा ताण निर्माण झाला असून, या वाढत्या दबावामुळे कर्मचाऱ्यांचे मानसिक संतुलन धोक्यात येत असल्याची गंभीर चर्चा आता प्रशासनिक वर्तुळात सुरू झाली आहे.



महापालिका, नगरपरिषद,महसूल,शिक्षण,आरोग्य,ग्रामविकास आदी विभागांतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ कामांसोबतच जनगणनेची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. परिणामी, एकाच व्यक्तीकडून दोन नव्हे तर तीन-तीन कामे करून घेतली जात आहेत, अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र होताना दिसत आहे. शिक्षकांना शाळांमधील अध्यापनासोबत सर्वेक्षणाचे काम, महसूल कर्मचाऱ्यांना मूळ प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत जनगणनेची नोंदणी, तर नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना कर वसुली, स्वच्छता, पाणीपुरवठा, नागरिकांच्या तक्रारी आणि त्याचवेळी एसआरआर नोंदी अशा अनेक कामांचा ताण सहन करावा लागत आहे. यामुळे सामान्य नागरिकांची दैनंदिन कामेही प्रभावित होत असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी दाखले, परवानग्या, नोंदी आणि नागरिकांच्या अर्जांवर विलंब होत असून कार्यालयांमध्ये नाराजीचे वातावरण वाढत आहे. फोनवर एसआरआर, प्रत्यक्षात जनतेची कामे काही कर्मचाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, सकाळपासून संध्याकाळपर्यंत फोनवर वरिष्ठांचे आदेश, एसआरआरचे अपडेट आणि जनगणनेचे टार्गेट यामुळे श्वास घ्यायलाही वेळ मिळत नाही. प्रत्यक्षात जनतेची कामे करण्यासाठी पुरेसा वेळच राहत नाही. एका कर्मचाऱ्याने सांगितले की, मूळ कार्यालयीन कामे प्रलंबित राहत आहेत. सततच्या तणावामुळे वैयक्तिक आयुष्यावर आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. काही सहकाऱ्यांमध्ये चिडचिड, नैराश्य आणि मानसिक थकवा वाढताना दिसत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे अनेक कर्मचारी उघडपणे आपली व्यथा मांडण्यासही घाबरत आहेत. वरिष्ठांकडून कारवाई होण्याची किंवा नकारात्मक नोंदी केल्या जाण्याची भीती असल्याने कर्मचारी मनातील ताण दाबून ठेवत असल्याचे बोलले जात आहे. यामुळे विभागीय स्तरावर असंतोष वाढत असून, कर्मचाऱ्यांमध्ये कामाचा ताण की मानसिक छळ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. काही कर्मचारी संघटनांनी या परिस्थितीकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची मागणी केली आहे. जनगणना आणि एसआरआरसारख्या महत्त्वाच्या मोहिमांसाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, नियमित कर्मचाऱ्यांवरील अतिरिक्त भार कमी करावा आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य देणारी कार्यपद्धती राबवावी, अशी मागणी पुढे येत आहे. तसेच, आधीच अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे अनेक विभाग अडचणीत असताना त्याच कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या टाकल्याने प्रशासनाची कार्यक्षमता कमी होत असल्याची टीकाही होत आहे.

शासनाने केवळ योजना पूर्ण करण्यावर भर न देता, त्या राबवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याचाही विचार करणे तितकेच आवश्यक असल्याची भावना आता अधिक तीव्रतेने व्यक्त होत आहे. जनगणना आणि सर्वेक्षण ही शासनासाठी अत्यंत महत्त्वाची कामे असली, तरी ती राबवणाऱ्या कर्मचाऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालल्याची वस्तुस्थिती दुर्लक्षित करून चालणार नाही. प्रशासनाचा कणा असलेला कर्मचारीच मानसिक तणावाखाली दबला गेला, तर त्याचा परिणाम थेट जनतेच्या सेवांवर होणार आहे. म्हणूनच, योजना महत्त्वाच्या की माणूस? हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत असून, कर्मचारी वर्गाला दिलासा देणारे ठोस निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

**मानसिक आरोग्याचा विचार करा**

तज्ज्ञांच्या मते, सातत्याने वाढणारा कामाचा ताण, वेळेचे बंधन, वरिष्ठांचा दबाव आणि जनतेच्या अपेक्षा यामुळे कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. दीर्घकाळ तणावाखाली काम केल्यास नैराश्य, चिडचिड, निद्रानाश आणि कार्यक्षमतेत घट यांसारख्या समस्या निर्माण होण्याची शक्यता वाढते.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा गुणगौरव




**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

महावितरणामधील विविध पदावर कार्यरत असणाऱ्या आर्थिक वर्ष मार्च २०२५-२६ महिन्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वायरमन, लिपिक, वीज तांत्रिक, कनिष्ठ अभियंता आदी कर्मचारी वृंदांनी निभावलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ नुकताच निसर्ग फॉर्म हौस आंबोली येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सर्व बक्षीसपात्र कर्मचाऱ्यांना मुरुड महावितरणचे उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. हा सोहळा कार्यकारी अभियंता आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. या कौतुक सोहळ्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाने कामाची दखल घेऊन केलेला हा गौरव भविष्यात आणखी जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा देईल, अशा भावना सर्व कर्मचारी यांनी व्यक्त केल्या आहेत. या कार्यक्रमाला महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रवनकुमार वेमूला उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी कनिष्ठ अभियंता मनोज देशमुख,सतीश खरात, संदेश होंडे, कासीम शेख, सचिन पवार सहाय्यक अभियंता परमानंद बैकर, दिनेश ढाळे सहाय्यक लेखापाल विनायक ताजवे प्रधान तंत्रज्ञ विजय राठोड , गौरी राठोड आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## डॉ.धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वैद्यकीय उपकरणांचे वाटप

**| माणगाव | प्रतिनिधी |**

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सौजन्याने गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रास वैद्यकीय उपकरणांचे वाटप कार्यक्रम मंगळवारी (दि.२६) मे रोजी श्रीमती रुक्मिणिबेन नथुराम शेठ मंगल कार्यालय, गोरेगाव येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास माणगाव तहसीलदार विपीन लोकरे, गोरेगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार, गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. विनोद गोरेगावकर, भूपेंद्र शेठ, भारत गोरेगावकर, आर. आर.पाटील आदी मान्यवरांसह गोरेगाव विभागातील तसेच माणगाव तालुक्यातील श्री सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे समाजउपयोगी कार्य अत्यंत स्तुत्य व वाखण्याजोगे असून प्रतिष्ठानचे कार्य उत्तरोत्तर वाढत रहावे असे प्रतिपादन माणगाव तहसील कार्यालयाचे विपीन लोकरे यांनी गोरेगाव येथे कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. यावेळी तहसीलदार यांनी शासनातर्फे राबविण्यात येणारा जनगणना कार्यक्रमास सर्वानी सहकार्य करावे असे सांगत आयुष्यमानकार्ड देखील सर्वानी काढून घेण्याचे सूचित केले.

कार्यक्रमात गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रास मान्यवरांच्या हस्ते डॉ. विनोद गोरेगावकर व त्यांचे सहकारी यांच्याकडे स्टील स्प्रेअरवेल कपाट, रक्तदाब मोजण्याचे यंत्र, शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणारे चिमटे, वैद्यकीय साहित्य निर्जंतुक ठेवण्याचे डबे, प्रसूती दरम्यान वापरण्यात येणाऱ्या कात्र्या, प्रिंटरसहित कम्प्युटर, वॉटर कुलर, ऑक्सिजन प्रवाह मोजण्याचे यंत्र, व्हील चेअर, ऑपरेशन थिएटर टेबल, जखमेवरील टाके काढण्याचे व घालण्याचे स्टेपलर अशी रुग्णालयात लागणारी विविध वैद्यकीय उपकरणे सुपूर्द करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शालिनी शिर्के यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनोज भोईर यांनी केले.




### लोककलेतून जलसंवर्धन

**आगरदांडा :** चला पाण्याला पुनर्जीवन देऊया अमृत २.० सोबत जलसुरक्षित शहरे घडवूया या संदेशाखाली मुरूड शहरातील आझाद चौका जवळ महाराष्ट्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत लोककलेच्या माध्यमातून जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि शाश्वत नागरी विकासाचे महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले. अमृत २.० अभियानांतर्गत १०० टक्के पाणी पुरवठा जोडणी, जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन, हरित क्षेत्रांचा विकास, सांडपाणी प्रक्रिया आणि मलनि:स्सारण उपक्रमांची माहिती लोककला माध्यमातून नागरिकांना देण्यात आली. कलाकार हरेश तांबोळी, भरत दुर्गे, गौरव कालेकर, सिध्दार्थ कासारे, जगन्नाथ पाखरे, रोहिदास दाणे, कुणाल शिनारे, अमोद करंदेकर, संतोष शिकरे, सुशील गायकवाड यांनी लोककलाच्या माध्यमातून नागरिकांना जागृत केले.

## मोटार सायकल चोरांच्या मुसक्या आवळल्या

**| नेरळ | प्रतिनिधी|**

पार्किंग केलेल्या मोटर सायकल चोरी करून धुमाकूळ घालणारी टोळी रायगड पोलिसांकडून गजाआड करण्यात आली. नेरळ पोलिसाची गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही धडाकेबाज कामगिरी करीत मोटरसायकल चोरी करून धुमाकूळ घालणारी टोळीचा बीमोड करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील तसेच मुरबाड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मोटार सायकल चोरी प्रकरणे नोंद करण्यात आली होती. दि. ११ ते १४ मे रोजी फिर्यादी यांची सुझुकी कंपनीची एक्सेस १२५ मॉडेलची स्कूटी नंबर एम एच ४६ सी क्यू ७४०६ ही गाडी नेरल बाजारपेठ अमन मटन शॉप येथे पार्किंग करून ठेवली असता, अज्ञात चोरट्याने स्वत:च्या फायद्या करता चोरून नेली म्हणून सदरचा गुन्हा दाखल



करण्यात आला आहे. नेरळ मुरबाड परिसरातील मोटरसायकल चोरी करून धुमाकूळ घालणारे टोळी रायगड पोलिसांकडून गजाआड करण्यात आली. नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने नमूद गुन्ह्यातील अज्ञात आरोपी हे म्हसा तालुका मुरबाड जिल्हा ठाणे ग्रामीण येथील राहणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सापळा रचून चार आरोपींना (दि.१५) मे रोजी करण शिनगारे, वय १९ वर्ष राहणार पोस्ट कुलई, ता. मुरबाड जि. ठाणे, सुजल जाधव वय १९ वर्षे राहणार डोंगरन्हावे, विधी संघर्षित बालक,४) विधीसंघर्षित बालक असे असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींनी दिलेल्या कबुलीनुसार खात्री केली आणि गुन्ह्याची उकल केली. अटक आरोपी यांनी नेरळ पोलीस ठाणे मुरबाड पोलीस ठाणे हद्दीतून चोरी केलेल्या एकूण तीन मोटरसायकल यांची एकूण किंमत ९१ हजार रुपये किमतीचा मध्यमान हस्तगत करून प्रशासकीय कामगिरी केली आहे. या कारवाईसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत राहुल गायकवाड, नेरळ पोलीस ठाणे सह पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली, कारवाई पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सुशील काजलेकर, पोलीस हवालदार वाघमारे, पोलीस शिपाई केकाण, पोलीस शिपाई बेंद्रे, पोलीस शिपाई वांगनेकर या पथकाकडून कारवाई करण्यात आली.

### ईपीआर फाऊंडेशनतर्फे शाळेला भेट

**नवीन पनवेल :** लक्ष्मीबाई मारुतीराव बांदल स्कूल, येथे ईपीआर फाउंडेशनच्या संस्थापक अपर्णा शहा संस्थापीत खा-खेळा-वाचा जनजागृती अभियानांतर्गत सदिच्छा भेट आयोजित करण्यात आली. भारताला निरोगी आणि आनंदी राष्ट्र बनवणे या हेतू विद्यार्थ्यांना खा विचारपूर्वक, खेळा उत्साहपूर्वकआणिवाचाउत्स्फूर्तपणे या संकल्पनेविषयी मार्गदर्शन करण्यास अभियानाचे राजदूत तेथे पोहोचले. या कार्यक्रमात मुलांना योग्य आहाराचे महत्त्व, खेळाचे फायदे आणि वाचनाची सवय याबाबत माहिती देण्यात आली. तसेच कलाकृती आणि पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकर्षक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला. मुलांना स्वतः आत्मपरीक्षण करण्यासाठी डायरी वाटप देखील करण्यात आले.

ई-केवायसीमुळे सामान्य माणूस त्रस्त | पुरवठ्याच्या गोंधळात गरीबांचे हाल

# गॅस जोडणीसाठी नागरिक 'गॅस'वर

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहरात एका बाजूला विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत असताना दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या गॅससाठी अक्षरशः हेलपाटे मारावे लागत आहेत. नवीन घरात संसार थाटण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक कुटुंबांचे वास्तव मात्र, सध्या अत्यंत वेदनादायी बनले आहे. कारण नव्या गॅस कनेक्शनसाठी नागरिकांना महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत असून, स्वयंपाक करायचा तरी कसा? असा संतप्त आणि हतबल सवाल आता सर्वसामान्य गृहिणींकडून विचारला जात आहे.

विशेषतः नोकरीसाठी आलेले विद्यार्थी, कामगार, लहान कुटुंबे आणि नवविवाहित जोडपी या परिस्थितीमुळे प्रचंड मानसिक तणावाखाली आहेत. अनेक ठिकाणी हॉटेलमधील जेवणावर दिवस काढण्याची वेळ आली आहे. काहींनी तर महागड्या इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर सुरू केला असून त्यामुळे वीजबिलाचा अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे. नवीन गॅस कनेक्शन मिळवण्यासाठी नागरिकांकडून सातत्याने कागदपत्रांची मागणी केली जात आहे. आधारकार्ड, भाडेकरार, ओळखपत्र, बँक तपशील, हॉट प्लेट तपासणी, ई-केवायसी अशा अनेक प्रक्रियांमुळे सामान्य माणूस अक्षरशः त्रस्त झाला आहे.




एवढे सर्व करूनही सिलिंडर उपलब्ध नाही, प्रतीक्षा सुरू आहे, वरून आदेश नाहीत अशी उत्तरे देत नागरिकांना वारंवार परत पाठवले जात असल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, घरगुती ग्राहकांना सिलिंडर मिळत नसताना व्यावसायिक वापरासाठी मात्र, सिलिंडर सहज उपलब्ध होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे पुरवठा व्यवस्थेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सामान्य नागरिकांनाच का वेठीस धरले जाते? असा संतप्त सवाल अनेक ग्राहक विचारत आहेत. सुरक्षेच्या नावाखाली 'हॉट प्लेट निरीक्षण' सक्तीचे करण्यात आले असून त्यासाठी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याचीही तक्रार आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तपासणी आवश्यक असली तरी त्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सोपी आणि जलद असावी, अशी मागणी जोर धरत आहे. गॅसअभावी अनेक गृहिणींची अक्षरशः कोंडी झाली आहे. घरात भांडी आहेत, धान्य आहे, पण गॅस नाही मग संसार चालवायचा तरी कसा? असा भावनिक प्रश्न एका गृहिणीने व्यक्त केला. या संपूर्ण प्रकारात तेल कंपन्या आणि पुरवठा विभाग यांच्यात समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. नागरिक मात्र या यंत्रणांच्या गोंधळात भरडले जात आहेत. सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरातील चूल पेटती ठेवणे ही केवळ सुविधा नसून जीवनावश्यक गरज आहे. त्यामुळे शासन आणि संबंधित कंपन्यांनी कागदी प्रक्रियेपेक्षा नागरिकांच्या अडचणी समजून घेत तातडीने ठोस उपाययोजना करणे काळाची गरज बनली आहे.

**कनेक्शनची प्रक्रिया सुलभ करा**

प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नवीन गॅस कनेक्शनची प्रक्रिया सुलभ करावी, प्रलंबित अर्जांचा निपटारा करावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.जसंवत नानसंग परमार यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे टाकवे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४०/१ एकुण ०.६६.५० गुंठे जागा पैकी ०.२०.०० विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २७/०५/२०२६

**अॅड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीसीस हरकत

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, दि. १४/०५/२०२६ रोजी दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये खालील मिळकतींसंदर्भात मिळकतींचे सभांव्य खरेदीदारांमार्फत अॅड. एस. वाय. बारटके यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) | मालकांचे नांव |
|---|---|---|---|---|
| मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड | २५५/१ | ०-२२-८० | ४.९२ | दर्शना प्रितम नाईक<br>कल्पेश कमळाकर राऊत<br>कल्पना कमळाकर राऊत |
| मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड | २५५/२ | ०-२२-८० | ४.९२ | मंगेश सिताराम राऊत<br>सुरेखा प्रविण घरत |

आमच्या अशिल श्रीमती.सुजाता प्रभाकर काठे रा.मु.पो.मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.). |
|---|---|---|---|
| मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड. | २५५/३ | क्षेत्र ०-१९-६०<br>पो.ख. ०-०३-२०<br>एकूण ०-२२-८० | ४.९२ |

मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील जुना सर्व्हे नं. ९२/१, नवीन गट नं. २५५/० ही मिळकत १) लक्ष्मी गोविंद राऊत, २) सिताराम केशव राऊत, ३)विश्वनाथ केशव राऊत, ४) मधुकर कृष्णा राऊत यांच्या सामाईक मालकीची होती. मिळकतीचे सहमालक यांनी दि.१५/०५/१९९३ रोजी आपापसात तोंडी वाटप केले. वाटपानुसार लक्ष्मी गोविंद राऊत हिच्या हिश्श्यास गट नं. २५५/अ, क्षेत्र ०-२३-० हे.आर. ही मिळकत आली, सिताराम केशव राऊत यांच्या हिश्श्यास गट नं. २५५/ब, क्षेत्र ०-२३-० हे.आर. ही मिळकत आली, मधुकर कृष्णा राऊत यांच्या हिश्श्यास गट नं. २५५/कं, क्षेत्र ०-२३-० हे.आर. ही मिळकत आली व विश्वनाथ केशव राऊत यांच्या हिश्श्यास गट नं.२५५/ड, क्षेत्र ०-२३-० हे. आर. ही मिळकत आली. तशी मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथे तहसिलदार अलिबाग यांच्या कडील हुकुम नं.आर.टी.एस.कात/७ /७११७/३३०, दि.२७/०७/१९९२ ने नोंद होवून फेरफार नं.१०० ने दि.१५/०५/१९९३ रोजी मंजूर झाली व फेरफार नं.१०० नुसार ७/१२ दप्तरी गट नं.२५५/क या मिळकतीस सुजाता प्रभाकर काठे यांचे वडील वडील मधुकर कृष्णा राऊत यांच्या नावाची नोंद झाली व सध्या सदरहू मिळकत ही गट नं.२५५/३ ने ओळखली जात आहे.

मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २५५/अ, २५५/ब, २५५/क व २५५/ड या मिळकतींचे दि.१५/०५/१९९३ रोजी फेरफार नं.१०० ने वाटप झालेले असले तरी अद्याप आकारफोड झालेली नाही व तसेच स्वतंत्र नकाशेसुद्धा झालेले नाहीत.

मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट न. २५५/१, २५५/२, २५५/३ व २५५/४ या मिळकतींचे स्वतंत्र नकाशे न झाल्यामुळे स्वतंत्र हद्दींचे डिमार्केशनसुध्दा झालेले नाही व हिश्श्याबद्दल सहनिशासुध्दा झालेली नाही. असे असताना, पुर्वीचे मालक सिताराम केशव राऊत व सध्याचे मालक श्री.मंगेश सिताराम राऊत यांच्या हिश्श्याची गट नं. २५५/२, क्षेत्र ०-२३-० हे. आर., आकार ४.९२ रु.पै. ही मिळकत व पुर्वीचे मालक लक्ष्मी गोविंद राऊत व सध्याचे मालक श्री. कल्पेश कमळाकर राऊत, कल्पना कमळाकर राऊत व दर्शना प्रितम नाईक यांच्या हिश्श्याची गट नं.२५५/१, क्षेत्र ०-२३-० हे.आर., आकार ४.९२ रु.पै. या मिळकती त्रयस्थ इसमांस विकण्याच्या विचारात आहेत असे आमच्या अशिलांस दि.१४/०५/२०२६ रोजी दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये अॅड. सुयोग बारटक्के यांनी प्रसिद्ध झालेल्या नोटीसीवरुन खात्रीलायक समजले.

मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील जुना सर्व्हे नं. ९२/१, नवीन गट नं.२५५/० पैकी गट नं.२५५/३ ही मिळकत श्रीमती. सुजाता प्रभाकर काठे यांच्या मालकीची आहे. सदरहू मिळकतीसंदर्भात अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं.१६०/२०२४ ने श्री. कल्पेश कमळाकर राऊत यांनी कल्पना कमळाकर राऊत व इतर यांच्या विरुध्द दावा दाखल केलेला आहे व तो प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

आमच्या अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांच्या सांगण्यावरुन पुन्हा. असे नमुद करतो की, मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.२५५/१, २५५/२, २५५/३ व २५५/४ या मिळकतींची आकारफोड झालेली नाही व गट नं.२५५/३ ही मिळकत आमच्या अशिलांच्या मालकीची असल्यामुळे सर्व मिळकतींच्या हद्दीबद्दल सहनिशा झालेली नाही. त्यामुळे गट नं.२५५/१ व गट नं.२५५/२ या मिळकतींच्या खरेदीस आमच्या अशिलांची हरकत आहे.

मौजे मापगांव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २५५/१ व २५५/२ या मिळकतींच्या खरेदीचा व्यवहार केल्यास मिळकतींचे लगत कब्जेदार या नात्याने आमच्या अशिलांची हरकत आहे याची नोंद घ्यावी. याउपर गट नं २५५/१ व २५५/२ या मिळकतींच्या हस्तांतरणाचा व्यवहार झाल्यास आमचे अशिलांस कायदेशीर कारवाई करणे भाग पडले याची नोंदी घ्यावी.

अलिबाग.
दि.२६/०५/२०२६.

**SUNIL K. WAKADE**
Advocate High Court
Off. : D1. Hirabag Chs..
Behind Modakam Hotel, Alibag-Raigad
Mob. 9867715524, 7038682852

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

**मौजे दांडेतर्फे नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | भूमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| दांडेतर्फे नांदगाव | ८०/२ | ०-७७-०० | ००-३७ |

येणेप्रमाणे वर्णनाचे मिळकत त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, शेतघर, वगैरेसह अशा मिळकतीबाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती फोरम दत्तानी कपूर, मु. दांडेतर्फे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड व मुंबई यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्रीमती फोरम दत्तानी कपूर यांचे सदरहू मिळकतीवरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सबब,याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही, गहाण, बक्षिस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहिवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरुपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख :- २५-०५-२०२६

**(अॅड. एस.वाय.बारटके)**
**मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक संदेश सुरेश पाटील, सनिल सुरेश पाटील व सुरेश हरिभाऊ पाटील यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ११२/१/ब | ०-५३-६० | ११.४६ |

सदर मिळकतीपैकी संदेश सुरेश पाटील, सनिल सुरेश पाटील व सुरेश हरिभाऊ पाटील यांचे हिश्याचे ०-१६-० हे. आर इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : २७/०५/२०२६

**अॅड. अक्षय सुधीर म्हात्रे**
"अन्नपूर्णा" मु. पो. धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, मौजे आदाड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील ज्योत्स्ना नंदकुमार पारकर यांचे मालकीच्या भूमापन क्रमांक व उपविभाग ४११ एकुण क्षेत्र १-२३-०० (हे.आर) आकार ०.९७ (रू.पैसे) व भूमापन क्रमांक व उपविभाग ३९६/२ एकुण क्षेत्र १-८९-०० (हे.आर) आकार १.२१ (रू.पैसे) मिळकती आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकती निर्वेध असल्याबाबत वर नमूद विद्यमान मालकानी सांगितले आहे. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, वर नमूद कलेल्या मिळकतींत विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : २६.०५.२०२६.

**(अॅड. संदेश जगन्नाथ म्हात्रे)**
कार्या. अे १०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा,
बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड.

## जाहीर नोटीस

श्री.भावेश मोतीलाल ओसवाल रा. कर्जत, म्हाडा कॉलनी, ता.कर्जत, जि.रायगड यांचे सांगणेवरुन त्यांचे तर्फे अशी जाहीर नोटीस देणेत येते की, मौजे पळसदरी ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ३८/१क/४अ ची जमिन मिळकत आमचे पक्षकाराचे मालकी कब्जावहिवाटीची आहे. सदर मिळकत कर्जत खोपोली रस्त्यास लागून आहे. सदर मिळकतीबाबत आमचे पक्षकाराने कर्जत येथील दिवाणी न्यायालयात श्री.किशोर आव्हाड वगैरे इसमाविरुद्ध त्यानी चालविलेल्या अतिक्रमणाबाबत रे.मु.नं.४८/२०२६ चा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे. तसेच श्री. किशोर आव्हाड यांचे विरुद्ध मा. प्रांतसाहेब, मा. तहसिलदारसाहेब, सर्कल ऑफीसर, तलाठीसाहेब, कर्जत, पो. स्टेशनमध्ये लेखी तक्रार सुद्धा दाखल केली आहे. श्री.किशोर आव्हाड हे सदर जमिन मिळकत आमचे पक्षकाराचे मालकीची असताना, सदर जमिन ही सर्व्हे ३८/१क/३ असे भासवून व संबंधितांची दिशाभूल करुन विक्री करु पाहत आहे. आमचे पक्षकाराने त्यांचे मालकीची जमिन कर्जत तालुका भूमिअभिलेख यांजकडून रितसर मोजणी करुन घेऊन हद्द कायम करुन घेतली आहे व ती मिळकत त्यांचे प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीस आहे. अशी परिस्थिती असताना, तसेच दाव्याचे काम प्रलंबित असल्यामुळे इतर कोणीही सदर जमिन मिळकतीबाबत खरेदीचा व्यवहार करु नये याउपर तो केला गेल्यास संबंधिताविरुद्ध नाईलाजाने कोर्ट दरबार करणे भाग पडेल याबाबतची जाहीर नोटीस संबंधितांना देणेकामी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत येत आहे. याची नोंद घ्यावी. कळावे.

दिनांक २५-०५-२०२६

सही/-
अॅडव्होकेट
**मोतीलाल जि. ओसवाल**
बी.कॉम.एलएल.बी.
ऑफीस : भाविक अपार्ट.महावीर पेठ, कर्जत
पो.ता.कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९७३०८३३०४०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रकाश आत्माराम पाटील, रा. नागांव, खारगल्ली, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असलेली भातशेती मिळकत मी खालील सही करणार यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र(हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | १४१०/१ | ०-२०-१०<br>पो.ख.०-०५-४०<br>एकूण ०-२५-५० | १.३५ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करीन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २६-०५-२०२६

सही/-
**कृतज्ञा जनार्दन हाले**
रा.मु.रेवदंडा-बंदर, पो. रेवदंडा
ता.अलिबाग, जि. रायगड
मो.नं.७७७३९९३२७८

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

**मौजे दांडेतर्फे नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | भूमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| दांडेतर्फे नांदगाव | ८०/१ | ३-६०-०० | ९.८१ |

येणेप्रमाणे वर्णनाचे मिळकत त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, शेतघर, वगैरेसह अशा मिळकतीबाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती फोरम दत्तानी कपूर, मु. दांडेतर्फे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड व मुंबई यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्रीमती फोरम दत्तानी कपूर यांचे सदरहू मिळकतीवरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सबब,याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही, गहाण, बक्षिस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहिवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरुपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख :- २५-०५-२०२६

**(अॅड. एस.वाय.बारटके)**
**मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खार दुतर्फा बोर्ली, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक देवानंद हरिभाऊ पाटील व प्रज्ञा प्रदीप डंगर, प्रियांका सुधाकर चोगले, राजश्री रामचंद्र भोईर, संध्या गजानन पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट न./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खार दुतर्फा बोर्ली | ७२/३/ब | ०.९५.४०<br>पो.ख. ०.१०.९०<br>एकूण क्षेत्र १.०६.३० | १३.५० |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी खरेदीखत लिहुन देणार श्री. देवानंद हरिभाऊ पाटील यांच्या हिशाचे क्षेत्र ०.३२.७० हे.आर. आकार ४.२० रु.पै. व प्रज्ञा प्रदीप डंगर व इतर यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० हे.आर. आकार २.४१ रु.पै.इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा ) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि. २७/०५/२०२६

सही/-
**अॅड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण
मो. नं.९८२२०३०३८९, ७०३८४४११८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरीवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत तिचे मालक सुषमा सुर्यकांत कटके यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ९ | ४ | ०-१०-१० | ०=६५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २६-०६-२०२६

**अॅड. महेश मोतीराम घारे**
**मु. सांगवी,ता.कर्जत जि. रायगड**
**मो.९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे आंबिवली ता. सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-आंबिवली, ता. सुधागड, जि.रायगड**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. प्रकाश दत्तात्रेय राजिवडे व ३ | २/३ | ०-०९-०० | ०-०६ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र, मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली-सुधागड
दिनांक : २६-०५-२०२६

सही/-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
अॅडव्होकेट
मु.पो.नवीन पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड, मो.बा. नं. ८१४९६५१५०८

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे पाटणी पांडापुर, ता.पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.मनोहर दामोदर ठाकुर व श्री अतुल पांडुरंग गावंड यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट न./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर | ६५/२/ड | ०.२५.००<br>पो.ख. ०.००.६०<br>एकूण क्षेत्र ०.२५.६० | ३.७८ |
| पाटणी पांडापुर | ८५/३/अ | ०.२२.००<br>पो.ख.०.०१.३०<br>एकुण क्षेत्र ०.२३.३० | ३.४४ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी खरेदीखत लिहुन देणार श्री. मनोहर दामोदर ठाकुर यांच्या हिशाचे क्षेत्र ०.२५.६० हे.आर. आकार ३.७८ रु.पै. व अतुल पांडुरंग गावंड यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.२३.३० हे.आर. आकार ३.४४ रु.पै.इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकवीस) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि. २७/०५/२०२६

सही/-
**अॅड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो.नं.९८२२०३०३८९, ७०३८४४११८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे पराडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) अमेय दिनेश मुसळे २) दिनेश सदाशिव मुसळे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे पराडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३ | २/अ | १-२०-०० | ११-२५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २७/०५/२०२६

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर, मुद्दे खुर्द,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे
श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय नवीन पनवेल, तालुका पनवेल (रायगड)
(मराठी व इंग्रजी माध्यम )
महाराष्ट्र शासन व एन. सी. टी. ई. मान्यता प्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये

**व्यवस्थापन कोटा**

**डी.एल.एड. (डी.एड) प्रवेश २०२६-२७ साठी**

जागांकरिता अर्ज मागवित आहे.

- शैक्षणिक पात्रता: इ. १२ वी, मागासवर्गीयांसाठी ४४.५०% व खुला गट ४९.५० % गुणांसह उत्तीर्ण.
- MCVC विद्यार्थ्यांना १. कृषी गटातील हार्टीकल्चरल व क्रॉप सायन्स किंवा आरोग्य व वैद्यकीय सेवा गटातील क्रेंच अँड प्रीस्कूल मॅनेजमेंट विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- YCMOU मधून पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन FYBA किंवा पदवी उत्तीर्ण.
- शाखा निहाय व माध्यम निहाय उपलब्ध जागा :

| माध्यम | विज्ञान | कला | वाणिज्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ०५ | ०४ | ०१ | १० |
| इंग्रजी | ०५ | ०४ | ०१ | १० |

- **संवर्गनिहाय उपलब्ध जागा :**

| माध्यम | खुला | एससी+ एसटी | व्हीजे+एनटीबी + एनटीसी + एनटीडी | एसबीसी + ओबीसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ५ | २ | १ | २ | १० |
| इंग्रजी | ५ | २ | १ | २ | १० |

उपलब्धतेनुसार सामाजिक, घटनात्मक व संवर्गनिहाय आरक्षण राहील . अपेक्षित सवर्गातील व शाखेतील अर्ज न आल्यास इतर संवर्ग व शाखातून जागा भरल्या जातील. अर्ज विक्री दिनांक २७/५/२०२६ ते १/६/२०२६ तसेच अर्ज स्वीकृती दिनांक २७/५/२०२६ ते २/६/२०२६या कार्यालयीन वेळात १०.३० ते ५.०० पर्यंत राहील. प्रवेश अर्जाची किंमत खुला गट २०० रु. व मागासवर्गीयांसाठी १०० रु. याप्रमाणे असेल. मराठी माध्यमाचे शैक्षणिक शुल्क १५०००/- रु. व इंग्रजी माध्यमाचे शैक्षणिक शुल्क १५०००/- रुपये असेल.

**संपर्क**
**प्राचार्या**
**श्रीमती मधाळे कुसुम पारिसा**
श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय
प्लॉट नंबर ४१ सेक्टर १५, पनवेल रेल्वे स्टेशन जवळ, नवीन पनवेल,
जिल्हा रायगड ४१०२०६ फोन नंबर ९८२१७०४३५०/९०८२५२८५६८/ ९९६०९३८०६१/९९६९०७६२६७/७७३८६०८०८८

## जाहीर नोटीस

माझे आशिल श्री.वासुदेव चंदर पाटील व श्री. देवानंद वासुदेव पाटील दोहो मु. कोयनावेळे/घोट (तळोजा), ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळिवणेत येते ते खालील प्रमाणे :-

**मौजे घोट, ता. पनवेल, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मि. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २०/३/२ | ०.०४.६० | ०.७८ |

येणे प्रमाणे वर्णनाचे जमिन मिळकतीत पनवेल महानगरपालिका मालमत्ता क्र. ४३५ ही चाळ वजा तळमजला अधिक तिन मजले अशी मिळकत/इमारत आहे. पनवेल महानगरपालिका मालमत्ता क्र. ४३५ हि मिळकत माझे अशिल क्र.२ यांचे नावे नोंदली आहे. माझे आशिल क्र. १ यांनी वर नमुद जमिन मिळकत श्री बाबुराव कृष्णा भोईर, रा. राधा कृष्ण मंदिर जवळ, सेक्टर १०, कोपरा गाव, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ यांस खरेदी दिलेली नाही. तसेच सदर मिळकतीचा कब्जा श्री. बाबुराव कृष्णा भोईर यांस दिलेला नाही. मात्र, श्री. बाबुराव कृष्णा भोईर याने माझे आशिल क्र. १ यांचा मुलगा संतोष वासुदेव पाटील व इतर यांचेशी संगनमत करून मौजे घोट गट क्रमांक व उपविभाग २०/३/२, क्षेत्र ०.०४.६० हे. आर., आकार रू. ०.७८ पैसे या मिळकती बाबत स्वतःचे नावे दिनांक २९.०६.२०२६ रोजीचे बेकायदेशीर खरेदीखत करून घेतले आहे.

माझे आशिल यांना सदर दिनांक २९.०६.२०२६ रोजीचे खरेदीखताची माहीती नुकतीच झाली आहे. माझे आशिल हे श्री.बाबुराव कृष्णा भोईर व इतर यांचे विरूद्ध खरेदीखत रद्द करून मिळणे व इतर मागण्यां करीता पनवेल न्यायालयात स्वतंत्र दावा करणार आहेत. आता बेकायदेशीर खरेदीखताचा आधार घेवुन श्री. बाबुराव कृष्णा भोईर हे सदरहु जमिन मिळकतीत त्रयस्तांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचे प्रयत्नात आहेत, असे समजते.

तरी, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री.बाबुराव कृष्णा भोईर, रा. राधा कृष्ण मंदिर जवळ, सेक्टर १०, कोपरा गाव, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ याचेशी मौजे घोट गट क्रमांक व उपविभाग २०/३/२, क्षेत्र ०.०४.६० हे. आर., आकार रू. ०.७८ पैसे या मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री व्यवहार करू नये. त्यास माझे आशिल यांची सक्त हरकत आहे. कळावे.

**अलिबाग**
**तारीख २५.०५.२०२६**

**(अॅड.एस.वाय.बारटके)**
**मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मुरूड, ता. मुरूड, जि. रायगड येथील गट नं. २३२/११/ब, एकुण क्षेत्र ०-२५-०० हे.आर., आकार ०.२० रू. पैसे, ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक नितीन नामदेव आंबुर्ले व विजयकुमार आप्पा कोर्लेकर यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचे भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरी सदरहू मिळकतीत कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २६/०५/२०२६

**(अॅड.संजय द.म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली शेती मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काची पडताळणी करून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे रावतळी, ता. महाड, जि. रायगड.**

| नाव | गट व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| धमीर तौफिकुल शेख | ६८९ | ०-१७.००<br>०-०४.००<br>एकूण ०-२१.०० | ०=०६ |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहित असल्याचे गृहीत धरून आम्ही सदरहू मिळकतीची वरीलप्रमाणेचे मालकी हक्काची पडताळणी पूर्ण करून व मिळकत बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबत मालकी हक्काचा दाखला देण्याची तजविज करु व त्यानंतर आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.


ठिकाण : पनवेल,
दि. २६/०५/२०२६

**(हर्षद सुधाकर शेटटी)**
वकील.
पत्ता: बारवई गाव, पोस्ट पोयंजे,
ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.
फोन नं. ९७६८६७३१७२.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## स्पेनचा संघ रियल माद्रिदच्या खेळाडूविना

**माद्रिद :** स्पेनने फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ साठी आपल्या २६ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. वर्ल्ड कपच्या ९२ वर्षांच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडले आहे की स्पॅनिश फुटबॉल क्लब रियल माद्रिदचा कोणताही खेळाडू स्पेनच्या संघात समाविष्ट नाही. स्पेनचे प्रशिक्षक डी ला फुएंते म्हणाले, मी कोणत्याही क्लबला पाहून खेळाडू निवडत नाही. माझ्यासाठी फक्त हे महत्त्वाचे आहे की खेळाडूंना देशाचे प्रतिनिधित्व करताना अभिमान वाटला पाहिजे.या हंगामात रियल माद्रिद कोणतीही ट्रॉफी जिंकू शकली नाही आणि ला लीगामध्ये बार्सिलोनापेक्षा आठ गुणांनी मागे राहिली. संघात बार्सिलोनाच्या १८ वर्षीय स्टार खेळाडू लामिन यामलला स्थान मिळाले आहे. स्पेनने युरो कप २०२४ चे विजेतेपद पटकावले होते. यामलला मयंग प्लेयर ऑफ द टूर्नामेंटफ म्हणून निवडण्यात आले होते.गेल्या महिन्यात बार्सिलोनासाठी खेळताना यामलला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती. असे असूनही, प्रशिक्षक लुईस डी ला फुएंते यांनी त्याला संघात कायम ठेवले आहे. ॲथलेटिक बिल्बाओचा निको विल्यम्स देखील दुखापतीशी झुंजत आहे, परंतु त्यालाही संघात स्थान मिळाले आहे.

## फिफा विश्वचषकापूर्वी अर्जेन्टिनाला धक्का

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील ममेजर लीग सॉकरफ मध्ये इंटर मियामी आणि फिलाडेल्फिया युनियन यांच्यातील सामन्यादरम्यान स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या पायाला दुखापत झाली आहे. आगामी फिफा विश्वचषकाचे काऊंटडाऊन सुरू झाले असतानाच, या दुखापतीमुळे विश्वचषकापूर्वी अर्जेन्टिनाच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सामन्यात सहसा संपूर्ण वेळ खेळणाऱ्या मेस्सीला ७३ व्या मिनिटाला काहीसा त्रास जाणवू लागला. त्यामुळे त्याने स्वतः हून मैदानाबाहेर जाण्याचा निर्णय घेतला. मैदान सोडल्यानंतर तो थेट ड्रेसिंग रूमकडे गेला. दुसऱ्या सत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे मैदान निसरडे झाले होते, ज्यामुळे ही दुखापत झाली असावी असा अंदाज आहे. दरम्यान, मेस्सी कोणत्याही वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या मदतीशिवाय स्वतः चालत बाहेर गेल्याने ही दुखापत गंभीर नसावी आणि खबरदारीचा उपाय म्हणून त्याला विश्रांती दिली असावी, अशीही शक्यता वर्तवली जात आहे. या अटीतटीच्या सामन्यात इंटर मियामीने फिलाडेल्फिया युनियनवर ६-४ असा थरारक विजय मिळवला. फिलाडेल्फियाने सुरुवातीलाच २-० अशी आघाडी घेतली होती, मात्र मियामीने जोरदार पुनरागमन केले.

## विंडीज दौऱ्यासाठी श्रीलंका टीमची घोषणा

**श्रीलंका :** श्रीलंका क्रिकेट टीम जून महिन्यात वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. श्रीलंका या दौऱ्यात वेस्ट इंडिज विरुद्ध वनडे, टी २० आणि कसोटी मालिका खेळणार आहे. उभयसंघात एकूण ३ मालिकांमध्ये ८ सामने खेळवण्यात येणार आहेत. उभयसंघात ३ जून ते ७ जुलै दरम्यान ३ मालिकांचा थरार रंगणार आहे. श्रीलंकेने या तिन्ही मालिकांसाठी सोमवारी संघ जाहीर केला आहे. श्रीलंका क्रिकेट बोर्ड आणि आयसीसीने संघ जाहीर करण्यात आल्याची माहिती सोशल मीडियावरुन दिली आहे. श्रीलंका निवड समितीने वनडे आणि टी २० क्रिकेट मालिकेसाठी संघ जाहीर करताना मोठा निर्णय घेतला आहे. निवड समितीने व्हाईट बॉल सीरिजसाठी कॅप्टन बदलला आहे. कुसल मेंडीस याला टी २० आणि वनडे टीमचा कॅप्टन करण्यात आलं आहे. कुसल चरिथ असलंका याच्या जागी नेतृत्व करणार आहे. तर धनंजय डी सिल्वा कसोटी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळणार आहे. श्रीलंकेच्या विंडीज दौऱ्याची सुरुवात वनडे सीरिजने होणार आहे. तर कसोटी मालिकेने सांगता होणार आहे. तर या दरम्यान टी २० मालिकेचा थरार क्रिकेट चाहत्यांना पाहायला मिळणार आहे.

## डोपिंग फ्रेंडली स्पर्धेने क्रीडाजगतात संताप

**न्यूयॉर्क :** जोखीम आणि नफ्याच्या पायावर उभ्या असलेल्या लासवेगास शहरात सध्या एका विचित्र खेळाची पटकथा लिहिली गेली. लेखक होते ४८ वर्षीय अब्जाधीश बायो-हॅकर ख्रिश्चन एंगरमेयर. सकाळी उठून ते स्वतःला वजन कमी करणारी औषधे, टेस्टोस्टेरॉन आणि कायदेशीर वाढीचे हार्मोन्स इंजेक्ट करतात. लक्ष केंद्रित करण्यासाठी स्लीप ॲप्नियाचे औषध आणि लोकांशी मिसळण्यासाठी ऑक्सिटोसिनची मदत घेतात. एंगरमेयर स्वतः ४८ व्या वर्षी ३८ वर्षांचे दिसतातच, पण आता ते संपूर्ण जगाला बायो-हॅकिंगचे वेड लावण्यासाठी निघाले आहेत. गेल्या रविवारी झालेल्या या अनोख्या स्पर्धेत ॲथलीट्सना ड्रग्स, स्टेरॉइड्स, हार्मोन्स आणि पेप्टाइड्स घेण्यावर कोणतेही बंधन नव्हते, उलट त्यांना उघडपणे हे घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. क्रीडा इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या स्पर्धेची उघडपणे डोपिंगला प्रोत्साहन देण्यासाठी तयारी करण्यात आली. पहिल्यांदाच झालेल्या या आयोजनात जगभरातील ४२ आघाडीच्या जलतरणपटूंनी, धावपटूंनी आणि वेटलिफ्टर्सनी भाग घेतला, ज्यात ऑलिंपिक पदक विजेतेही होते. या कार्यक्रमामुळे क्रीडा जगतात आणि वैद्यकीय तज्ज्ञांमध्ये संताप आहे. वर्ल्ड अँटी-डोपिंग एजन्सीने इशारा दिला आहे की, जरी ही औषधे डॉक्टरांच्या देखरेखीखाली दिली जात असली तरी, त्यांच्या कॉकटेलमुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, यकृताचे नुकसान आणि अचानक मृत्यूचा धोका वाढतो.

# प्लेऑफचा थरार वाढला

## ऑरेंज-पर्पल कॅपची चुरस शिगेला, खेळाडूंमध्ये कांटे की टक्कर




**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून प्लेऑफचे चित्र स्पष्ट झाले आहे. मात्र केवळ संघांच्या लढतीच नाही, तर ऑरेंज कॅप आणि पर्पल कॅपच्या शर्यतीमुळेही स्पर्धेतील रोमांच शिगेला पोहोचला आहे. या हंगामात फलंदाज आणि गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत चाहत्यांचे भरपूर मनोरंजन केले आहे.

ऑरेंज कॅप स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजाला दिली जाते, तर पर्पल कॅप सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजाच्या नावावर असते. यंदा या दोन्ही कॅप्ससाठी अखेरपर्यंत जोरदार चुरस पाहायला मिळू शकते.

गुजरातचा सलामीवीर साई सुदर्शन सध्या सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये आघाडीवर आहे. त्याने १३ सामन्यांमध्ये ६३८ धावा केल्या आहेत. गुजरातचा कर्णधार शुबमन गिल देखील जोरदार फॉर्ममध्ये आहे. शुबमनने १३ सामन्यांमध्ये ६१६ धावा केल्या आहेत. दोघांनी मिळून अनेक विक्रम मोडले असून गुजरातच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. दरम्यान, सनरायझर्स हैदराबादचा हेनरिच क्लासेन यानेही तुफानी फलंदाजी करत १४ सामन्यांमध्ये ६०६ धावा केल्या आहेत. तो या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. राजस्थान रॉयल्सचा वैभव सूर्यवंशी हा देखील या स्पर्धेत सर्वात मोठा चर्चेचा विषय ठरला आहे. १४ सामन्यांत ५८३ धावा करत त्याने ऑरेंज कॅपच्या शर्यतीत स्वतःला कायम ठेवले आहे. याशिवाय ईशान किशन ५६९ धावा, अभिषेक शर्मा ६६३ धावा आणि विराट कोहली ५५७ धावांसह शर्यतीत कायम आहेत.

### पर्पल कॅपसाठी ३ गोलंदाजांमध्ये थेट लढत

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा गोलंदाज भुवनेश्वर कुमार पर्पल कॅपच्या यादीमध्ये आघाडीवर आहे. त्याने १४ सामन्यांत २४ विकेट घेत प्रतिस्पर्धी फलंदाजांना हैराण केले आहे. गुजरात टायटन्सचा धडाकेबाज वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा देखील या शर्यतीत जोरदार आव्हान देत आहे. रबाडानेही २४ विकेट घेत भुवनेश्वरच्या बरोबरीत स्थान मिळवले आहे. राजस्थान रॉयल्सचा गोलंदाज जोफ्रा आर्चरच्या खात्यात २१ विकेट आहेत.

### युवा खेळाडूंची लागणार कसोटी

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु, गुजरात टायटन्स, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स या चार संघांनी प्लेऑफमध्ये स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे, या हंगामात युवा खेळाडूंनी अनुभवी स्टार्सना कांटे की टक्कर दिली आहे. त्यामुळे २०२६ च्या अखेरीस कोण ऑरेंज कॅप आणि कोण पर्पल कॅप जिंकणार याकडे लक्ष लागले आहे.

# टीम इंडियाची इंग्लंडमध्ये विजयी सलामी

**| इंग्लंड | वृत्तसंस्था |**

१२ जूनपासून आगामी आयसीसी टी २० वर्ल्ड कप स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. त्यामुळे टीम इंडिया आणि इंग्लंडसाठी टी २० मालिका अतिशय महत्त्वाची आहे. त्याआधी टीम इंडियाने इंग्लंडमध्ये पोहचताच विजयी सलामी दिली आहे.

वुमन्स टीम इंडियाने सराव सामन्यात इसीबी डेव्हलपमेंट वुमन्स ईलेव्हन टीमवर जबरदस्त असा विजय साकारला आहे. टीम इंडियाने या सराव सामन्यात ७ विकेट्सने विजय मिळवला. या २० षटकांच्या सामन्याचं आयोजन हे चेल्म्सफोर्डमधील अँबेसडर क्रूझ लाईन मैदानात करण्यात आलं होतं. टीम इंडियाच्या महिला ब्रिगेडने या सामन्यात बॅटिंग आणि त्याआधी बॉलिंगने जबरदस्त कामगिरी केली आणि चाहत्यांची मनं जिंकली. विशेष बाब म्हणजे टीम इंडियाने विजयी आव्हानापेक्षा अधिक धावा केल्या. क्रिकेटमध्ये साधारणपणे विजयी धावा पूर्ण केल्यानंतर सामना संपतो. मात्र या सामन्यात तसं झालं नाही. टीम इंडियाने लक्ष्य पूर्ण केल्यानंतरही अतिरिक्त ४५ धावा केल्या. कमाल म्हणजे अंपायरनेही थांबवलं नाही.

इंडियाच्या बॉलिंगसमोर इसीबी डेव्हलपमेंट टीमला २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून १५४ धावांपर्यंतच मजल मारता आली. यजमान संघासाठी फ्लोरेंस मिलर हीने सर्वाधिक ४८ आणि जोआन गार्डनर हीने ३६ धावांचं योगदान दिलं. कॅप्टन सोफिया स्मेन हीने नाबाद २७ धावा केल्या.

टीम इंडियासाठी अरुंधती रेड्डी हीने सर्वाधिक ३ विकेट्स मिळवल्या. तर दीप्ती शर्मा आणि श्रेयांका पाटील या दोघींनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली. टीम इंडियाने १५५ धावांचं आव्हान हे ३ विकेट्सच्या मोबदल्यात १६.२ ओव्हरमध्ये पूर्ण केलं. मात्र टीम इंडियाने विजयानंतरही धावा करणं सुरुच ठेवलं.

# वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार हरमनप्रीत कौरला पद्मश्री प्रदान

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी राष्ट्रपती भवनाच्या प्रजासत्ताक मंडपात २०२६ सालचे पहिले टप्प्यातील पद्म पुरस्कार प्रदान केले. प्रजासत्ताक दिनाच्या एक दिवस आधी, २५ जानेवारी रोजी सरकारने १३१ पद्म पुरस्कार विजेत्यांची नावे जाहीर केली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात ६६ मान्यवरांचा आज सन्मान करण्यात आला, तर उर्वरित विजेत्यांना दुसऱ्या टप्प्यात पुरस्कार प्रदान केले जातील. यातच भारतीय महिला क्रिकेट संघाची आणि मुंबई इंडियन्सच्या महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हरमनप्रीत कौरने भारतासाठी ७ कसोटी, १६४ एकदिवसीय आणि १९५ टी-२० सामने खेळले आहेत. तिने कसोटीत २३०, एकदिवसीय सामन्यांमध्ये ४५४१ आणि टी-२० सामन्यांमध्ये ३९९१ धावा केल्या आहेत. हरमनप्रीतच्या नावावर कसोटीत एक अर्धशतक, एकदिवसीय सामन्यांमध्ये सात शतके आणि २४ अर्धशतके, तर टी-२० सामन्यांमध्ये एक शतक आणि १६ अर्धशतके आहेत.

# सोहम सहमतेचा धमाकेदार विजय

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

युवा बुद्धिबळपटू सोहम सुदर्शन सहमते याने उच्च मानांकन असलेल्या शार्दूल कदम आदित्य याचा पराभव केला. यासह सोहमने अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर्स स्पर्धेच्या चौथ्या सत्राच्या दुसऱ्या फेरीत सर्वांचे लक्ष वेधले. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना सोहमने आत्मविश्वासपूर्ण खेळ केला आणि मधल्या टप्प्यात आपल्या मोहऱ्यांच्या अचूक समन्वयातून प्रतिस्पर्ध्यावर दबाव निर्माण केला.

# श्रेयस अय्यरला दुहेरी झटका!

## कर्णधारपदाचे स्वप्न भंगणार; शुभमन गिल मारणार बाजी?

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट संघाच्या टी-२० कर्णधारपदासाठी प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या श्रेयस अय्यरला आता दुहेरी फटका बसण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. आयपीएलच्या चालू हंगामात त्यांच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्सची कामगिरी आणि गुणतालिकेतील स्थान पाहता, अय्यरच्या कर्णधारपदाच्या स्वप्नाला मोठा सुरुंग लागला आहे.

पंजाब किंग्सने यंदाच्या आयपीएल हंगामाची धमाकेदार सुरुवात केली होती.




सुरुवातीच्या टप्प्यात संघाने सातत्यपूर्ण कामगिरी करत सहा विजय नोंदवले होते आणि १३ गुणांपर्यंत मजल मारली होती. एका सामन्यात पावसाचा व्यत्यय आल्याने मिळालेल्या एका गुणाचाही त्यांना फायदा झाला होता. मात्र, त्यानंतर पराभवाचे जे सत्र सुरू झाले, ते थांबण्याचे नावच घेत नव्हते. शेवटच्या साखळी सामन्यात विजय मिळवून संघाने १५ गुणांपर्यंत मजल मारली असली, तरी राजस्थान रॉयल्सच्या विजयामुळे त्यांचे प्लेऑफमधील स्थान हुकले आणि संघ गुणतालिकेत पाचव्या क्रमांकावर फेकला गेला.

जेव्हा श्रेयस अय्यर आणि पंजाब किंग्सचा संघ विजयरथावर स्वार होता, तेव्हा अय्यर भारतीय २० संघाच्या कर्णधारपदासाठी अग्रक्रमी मानले जात होते.त्यांच्यानेतृत्वाखालील संघाची शिस्तबद्ध कामगिरी आणि स्वतः अय्यर यांनी केलेली फलंदाजी यामुळे त्यांच्या नावाची चर्चा जोरात होती. मात्र, आयपीएलच्या उत्तरार्धात संघाचा झालेला घसरगुंडीचा प्रवास आणि प्लेऑफमधील अनुपस्थिती यामुळे आता त्यांच्या कर्णधारपदाच्या दाव्याची हवा निघून गेली आहे. एकीकडे आयपीएल जेतेपदाचे स्वप्न भंगले असताना, आता भारतीय संघाच्या नेतृत्वाचा दावाही कमकुवत दिसत आहे.

भारतीय संघ आगामी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेसाठी मैदानात उतरण्यास सज्ज होत आहे. अशातच, सूर्यकुमार यादव हे आता फार काळ भारतीय २० संघाचे कर्णधार राहणार नसल्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर, गुजरात टायटन्सला प्लेऑफमध्ये नेणारा कर्णधार गिल आता आघाडीवर आला आहे. गिलने केवळ आपल्या नेतृत्वानेच नव्हे, तर फलंदाजीतही चमकदार कामगिरी केली आहे. आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळ भविष्यातील टी २० कर्णधाराबाबत काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे. श्रेयस अय्यरसाठी हा काळ अत्यंत कठीण असून, त्यांना आपल्या कर्णधारपदाच्या दाव्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आता अधिक संघर्षाची गरज भासणार आहे.

# सिंगापूर ओपनमध्ये सिंधू-लक्ष्य सेन रचणार इतिहास!

**| सिंगापूर | वृत्तसंस्था |**

सिंगापूर ओपन सुपर ७५० या बॅडमिंटन स्पर्धेला सुरुवात होत आहे. या स्पर्धेमध्ये भारतीय संघाची मदार पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन या दोन खेळाडूंवर असणार आहे. या दोन खेळाडूंकडून सातत्यपूर्ण कामगिरीची अपेक्षा केली जात असून, जेतेपदाचा दुष्काळही त्यांना संपवायचा असणार आहे.

लक्ष्य सेन याने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत विजेता होण्याचा मान संपादन केला असून, मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेचे जेतेपदही त्याने आपल्या नावावर केले होते.



तिथपासून मात्र लक्ष्य सेन याला एकाही स्पर्धेचे जेतेपद पटकावता आलेले नाही.

ऑल इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. लक्ष्य सेन आता सिंगापूर ओपनमध्ये अजिंक्यपद पटकावण्यासाठी सर्वस्व पणाला लावेल यात शंका नाही. सलामीच्या लढतीत लक्ष्य सेन याला चीनच्या लू गुआंग झू याचा सामना करावयाचा आहे.

महिला एकेरीमध्ये पी. व्ही. सिंधू हिच्यासमोर इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वरदानी हिचे आव्हान असणार आहे. यंदाच्या मोसमात थायलंड ओपनमध्ये तिला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारता आली होती. मात्र जेतेपदापासून तिला दूरच राहावे लागले आहे.

पुरुषांच्या एकेरीमध्ये लक्ष्य सेन याच्यासह किदांबी श्रीकांत, एच. एस. प्रणोय या अनुभवी खेळाडूंसह आयुष शेट्टी हादेखील बॅडमिंटन कोर्टवर उतरणार आहे.

# वसई किल्ल्यात खेळांची कार्यशाळा

**| विरार | प्रतिनिधी |**

भारताची प्राचीन खेळांमधून मनोरंजनाबरोबरच बुद्धिमत्ता, रणनीती, एकाग्रता आणि सामाजिक संवाद यांचा विकास होत असे. भारतीय संस्कृतीतील अनेक खेळ आजही लोकपरंपरेत जिवंत असून त्यांचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. अशाच काही खेळाची कार्यशाळा येत्या रविवारी वसई किल्ल्यात भरणार आहे. यावेळी शराव्यूह, नवकंकारी, अष्टचामा, चक्रव्यूह आणि वाघबकरी याखालचे प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन श्रीदत्त राऊत हे करणार आहेत.

# राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा; यश्वी-अर्जुनला अजिंक्यपद




**| मुंबई | वृत्तसंस्था |**

पुण्याची यश्वी पटेल व मुंबई उपनगरचा अर्जुन अलुगुवेली यांनी मुंबईत पार पडलेल्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत (१९ वर्षांखालील) अजिंक्यपदाला गवसणी घातली. ग्रेटर मुंबई बॅडमिंटन संघटना आयोजित, बॅडमिंटन गुरुकुल प्रवर्तित आणि विलिंग्डन क्लब यांच्या यजमानपदाखाली ही स्पर्धा पार पडली.

पुण्याच्या यश्वी पटेलने आपली मानांकित खेळाडूंना पराभूत करण्याची मालिका कायम राखत नागपूरच्या सातव्या मानांकित निशिका गोखले हिचा पराभव करून मुलींचे विजेतेपद पटकावले. सामन्यात सुरुवातीला पिछाडीवर पडलेल्या यश्वी पटेलने शानदार पुनरागमन करत दमदार खेळाच्या जोरावर ११-२१, २१-१५, २१-१२ असा विजय मिळवला.

मुलांच्या १९ वर्षांखालील गटातील अंतिम सामन्यात मुंबई उपनगरच्या अव्वल मानांकित अर्जुन अलुगुवेलीने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत नागपूरच्या द्वितीय मानांकित रुत्वा सजवानवर २१-१६, २१-१८ असा सरळ गेममध्ये विजय मिळवला. डा नँग, अक्षय टी. ढेरे आणि विकी या खेळाडूंनी आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेमध्ये आपापल्या वजनी गटामध्ये सुवर्णपदक पटकावताना उल्लेखनीय प्रदर्शन केले. अक्षय ढेरे याने ५७ किलो वजनी गटात कझाकस्तानच्या येलमन अमनगेल्दी याच्यावर ४-२ असा विजय मिळवला आणि सुवर्णपदकाची कमाई केली.

# भारतीय महिला फुटबॉल संघासमोर बांगलादेशचे तगडे आव्हान

**| पणजी | वृत्तसंस्था |**

दक्षिण आशियाई फुटबॉल महासंघाच्या महिला फुटबॉल स्पर्धेत भारताने सर्वाधिक पाच वेळा विजेतेपद पटकावले आहे, पण मागील दोन्ही वेळेस त्यांचे आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आले, तर बांगलादेशने करंडकावर नाव कोरले.

स्पर्धा फातोर्डा येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर खेळली जाईल. भारताचा समावेश ब गटात आहे. त्यांचा पहिला सामना सोमवारी संध्याकाळी मालदीवविरुद्ध होईल, तर बांगलादेशविरुद्धची लढत ३१ मे रोजी खेळली जाईल. गटातील पहिले दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. अ गटात भूतान, नेपाळ, श्रीलंका हे संघ आहेत. अंतिम सामना ६ जून रोजी खेळला जाईल.

भारताने अखेरच्या वेळेस २०१९ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती. २०२२ व २०२४ मध्ये दोन्ही वेळेस अंतिम लढतीत नेपाळला हरवून बांगलादेश संघ विजेता ठरला, तर भारताचे आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आले होते.


## निशेषने फ्रिट्झला हरवले | स्वियातेकची विजयाने सुरुवात

# जोकोविच फ्रेंच ओपनच्या दुसऱ्या फेरीत

**| पॅरिस | वृत्तसंस्था |**

पॅरिसमध्ये सुरू असलेल्या फ्रेंच ओपनच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात नोव्हाक जोकोविचने फ्रान्सच्या जिओवानी मपेट्शी पेरिकाडला ५-७, ७-५, ६-१, ६-४ अशा फरकाने हरवले. या विजयासह ३ वेळा चॅम्पियन राहिलेल्या जोकोविचने स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे.

माजी वर्ल्ड नंबर १ जोकोविचने फ्रेंच खेळाडूच्या सर्व्हिसला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास सुरुवात केली आणि २ तास ५१ मिनिटांत सामना जिंकला. ही २४ वेळा ग्रँड स्लॅम चॅम्पियन राहिलेल्या




जोकोविचची फ्रेंच ओपनमधील १०२ वा विजय आहे.

या सामन्यासह जोकोविचने ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये आपली विक्रमी ८२वी उपस्थिती नोंदवली. या विजयासह, ग्रँड स्लॅमच्या पहिल्या फेरीतील सामन्यांमध्ये त्याचा विक्रम ८० विजय आणि २ पराभव असा झाला आहे. जोकोविच शेवटचा २००६ च्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या पहिल्या फेरीत हरला होता.भारतीय वंशाच्या अमेरिकन खेळाडू निशेष बसवरेड्डीने फ्रेंच ओपनमध्ये पहिला मोठा उलटफेर करत पहिल्या फेरीत सातव्या मानांकित अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झला हरवले. वाइल्डकार्ड एंट्री मिळालेल्या निशेषने रविवारी रात्री खेळल्या गेलेल्या दोन तास ४५ मिनिटांच्या अटीतटीच्या सामन्यात वर्ल्ड नंबर-९ फ्रिट्झला हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. २१ वर्षीय बसवरेड्डीचे पालक १९९९ मध्ये आंध्र प्रदेशातील नेल्लोर येथून अमेरिकेला स्थलांतरित झाले होते. तो २००० नंतर या ग्रँडस्लॅममध्ये टॉप-१० रँकिंगमधील खेळाडूला हरवणारा अमेरिकेचा पहिला पुरुष खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी २००० मध्ये यान-मायकेल गॅम्बिलने जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असलेल्या निकोलसला पराभूत केले होते.

महिला एकेरीत चार वेळा विजेती ठरलेल्या इगा स्वियातेकने फ्रेंच ओपनमध्ये पदार्पण करणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या युवा खेळाडू इमर्सन जोन्सला पहिल्या फेरीत ६-१, ६-२ अशा एकतर्फी लढतीत पराभूत केले. ग्रँडस्लॅमच्या पहिल्या फेरीत स्वियातेकचा हा २९ सामन्यांमधील २८वा विजय ठरला. महिला एकेरीत गेल्या वर्षीची उपविजेती जस्मिन पाओलिनीनेही विजय नोंदवला.

# तिकिटासाठी निवृत्त शिक्षकाने विकले घर

**| इंग्लंड | वृत्तसंस्था |**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेसाठी आता अवघ्या काही दिवसांचा अवधी शिल्लक राहिला आहे. यंदा स्पर्धेचं यजमानपद तीन देशांकडे असून ४८ संघ मैदानात उतरणार आहेत. १२ जूनपासून फुटबॉलचा महाकुंभ सुरू होणार असून तीन देशातील १६ शहरात ही स्पर्धा होणार आहे. एकूण १०४ सामने खेळले जाणार असून चाहते आपआपल्या संघाला प्रोत्साहन देण्यासाठी सज्ज झाले आहेत.

असं असताना एका फुटबॉलवेड्या चाहत्यांचं स्पर्धेप्रती असलेलं प्रेम समोर आलं आहे. खरं तर चाहत्याच्या कृतीला वेडेपणाच म्हणावं लागेल. पण एखाद्याला वेड लागलं तर सर्वस्वी पणाला लावतो. असंच काहीसं फुटबॉलप्रेमी अँडी मिल्न याचं आहे. त्याने फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत आपल्या संघाला पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक सामन्याचं तिकीट खरेदी केलं आहे. फुटबॉल सामन्यांचं तिकीट खरेदी करण्यासाठी अँडी मिल्न यांना आपलं घर विकावं लागलं.

अँडी मिल्न हे निवृत्त शिक्षक आहेत. ते शाळेत मुलांना शिकवायचे. पण त्याचं फुटबॉलप्रेम तिकीट खरेदीवर अधोरेखित झालं आहे. त्यांनी फिफा वर्ल्डकप २०२६ तिकीट खरेदीसाठी आपलं घर विकलं. त्यांनी नॉर्थविच येथे असलेलं आपलं घर साडे चार कोटींना विकलं. अँडी मिल्न वर्ल्डकप २०२२ मध्येही चर्चेत आले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२०६९, संपादकीय विभाग- email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओसिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८४५१३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा धाडीवाकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)